# श्री साईलीला

श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २९ ] त्रैमासिक—जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, १९५२ [ अंक १ ला

## संपादकीय

मानवाच्या पाठीमागें भीतीचें—भयाचें भूत लागलें असल्यानें तो जीवनांत बेजार झाला आहे. तो रात्रंदिवस अभयस्थान—सुखाचें ठिकाण शोधीत आहे. त्याकरितां नाना तऱ्हेच्या विषयाला तो कवटाळीत आहे.

अनित्यानि शरीराणि वैभवं नैवशाश्वतं ॥
नित्यं सन्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्म संग्रहः ॥

शरीर अनित्य म्हणजे क्षणभंगूर आहे तसेंच वैभवही शाश्वत नाहीं, मृत्यु तर नेहमीं सन्निध आहे. मरण केव्हां व कसें येईल याचा तर नेम नाहीं. यासाठीं धर्मसंग्रह करणें म्हणजे सत्कर्माचार ठेवणें हेंच काय तें प्रशस्त आहे.

धर्मराजाकडे एक याचक रात्रौ याचनेस आला. त्याला धर्मराजानें दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं येण्यास सांगितलें. हें ऐकून भीमानें आपला आनंददुंदुमी वाजविला. धर्मराजास आश्चर्य वाटलें व त्यानें भीमास विचारलें, "भीमा, आनंदाचें कांहीं कारण नसतां आनंददुंदुमी कां फुंकला गेला ?" भीमानें सांगितलें, "राजा, तूं उद्यांपर्यंत खचित

जगणार, हा तुझा सिध्दांत ऐकून आनंद प्रदर्शीत केला!" हें उपरोधिक भाषण राजानें जाणून देह क्षणभंगूर असल्याची आपणांस विस्मृति झाली म्हणून खेद झाला; व " भीमा, तूं मला जागृत केलेंस " म्हणून शाबासकी दिली.

मृत्यूचा ससेमिराच सर्वांना भेडसावीत आहे; व तो क्षणाक्षणाला आठवण–स्मृति देत आहे "सावधान" पण, मानव, विषयांच्या किमयेंत अडकल्यामुळें, भीतीच्या पोटीं दडलेला 'सावधान' इकडे लक्ष जात नाहीं.

एक तरुण गृहस्थ सणाच्या दिवशीं उत्सुकतेनें भोजनाचें सामान आणण्यासाठीं बाजारांत गेला. तो केळ्याच्या सालीवर घसरून पडला व मेला. कितीएक लग्नें लागून बोहल्यावरच मेलीं, मुलाचें बारसें आनंदानें करून पोटभर जेवून गेला तो गाडीखालीं सांपडला. नाहींतर लढाईतून वांचून परत आलेले आहेत. एकूण मृत्यूचा कांहींच नेम नाहीं. यासाठीं त्याचें भय सतत मनांत बाळगून कर्तव्य करणें म्हणजेच निर्भय होणें.

**भोगे रोगभयं सुखे क्षयभयं वित्तेषु चोरभयं ।**
**विद्यावाद भयं तपेंद्रिभयं रुपात्भयं योषितां ॥**
**हर्षे शोकभयं रणे रिपुभयं काये कृतांताभयं ।**
**इत्थं जन्म निरर्थकं क्षितितले विष्णोः पदे निर्भयं ॥**

अर्थात् श्रीमहाविष्णूचे चरण मला निर्भय आहेत. श्रीसद्गुरु साईनाथ माऊलीच्या चरणांचा आधार आपणांस असतांना आपण कां भ्यावें. दारिद्र्यानें पिडलें असतां खिन्नता वाटते. उत्साह रहात नाहीं व उमेद जाते खरी पण तशी वाटूं देऊं नये. श्रीविष्णु ज्याचे चरण निर्भयाचें ठिकाण आहे कीं ज्याचा आश्रय केला असतां अभयपद प्राप्त होतें.

विष्णूनें लक्ष्मीच्या बंधूला ( शंखाला ) आपल्या हस्ताच्या ठायीं धारण केलें असतांहि भिक्षेकरांच्या खांद्यावर बसून तो शंखध्वनि करीत भटकतो.

प्रारब्धानें कोणासही सोडलेलें नाहीं. श्रीरामचंद्रप्रभू, त्यालासुद्धां १४ वर्षें वनवास भोगणें प्राप्त झालें. प्रपंच व परमार्थ हे दोन्ही उत्तम प्रकारें जाणणें हें केवळ ज्ञानाचें काम आहे. वर्म व कर्म खुबीसहित मर्मानें जो प्रपंच जाणतो तोच परमार्थ जाणण्यास योग्य होतो.

अर्थात् या विसाव्या शतकांत अभयस्थान 'साईनाम' होय; व तें 'श्रीसाईलीला' हें त्रैमासिक रुपानें सर्वांच्या दारोदार येण्यास तयार आहे.

संपादक—

"श्रीसाई"

# वारकरी सांप्रदाय

## कीर्तन-माला पुष्प ३ रें

### मनाला शिकवण

**जय जय रामकृष्ण हरी । राजाराम कृष्ण हरी ॥**
**राजाराम कृष्ण हरी । राजाराम कृष्ण हरी ॥**

पुंडलिकवरदे हरी विठ्ठल; श्रीज्ञानदेव तुकाराम; श्रीपंढरीनाथ महाराज; श्रीशंकर महाराज; श्रीसच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज;

**मंगल मूर्ति मोरया;**

**सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेऊनिया ॥ १ ॥**
**तुळशी हार गळां कांसे पितांबर । आवडे निरंतर हेची ध्यान ॥ २ ॥**
**मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजीत ॥ ३ ॥**
**तुका म्हणे माझे हेची सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥**

जयविठ्ठल, जयहरी विठ्ठल । जयविठ्ठल, जयहरी विठ्ठल, जयविठ्ठल जयहरी विठ्ठल ॥

**नामघेतां आवडी । तुटेल संसाराची बेडी ॥ १ ॥**
**भाविकांशीं पावे । मागे मागे त्याच्या धांवे ॥ २ ॥**
**म्हणे जनार्दनाचा एका । आवडीनें नाम घोका ॥ ३ ॥**

जगद्वंदनीय संत एकनाथ महाराज आपणांला जिव्हाळ्याच्या कळवळ्यानें सांगताहेत कीं, बापहो तुम्हांला या संसाररुपी शृंखला तोडून मोकळें व्हायचें असेल, तर त्याला अगदीं सोपा, सरळ, सहज सुलभ, अगदीं रामबाण, खात्रीचा उपाय म्हणजे ईश्वराचें नाम घ्या. पण कसें घ्याल ? तर आवडीनें, एकभावानें, एकनिष्ठेनें घ्या. हा संसारसागर तरून जाण्यासाठीं "**नामसंकिर्तन साधन हें सोपें**" आहे, या नामाचा कासरा धरा, ईश्वराचें नांव प्रेमानें, आवडीनें घ्या. असें तुम्हीं करूं लागलांत, "**आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे**" ईश्वराचें नांव मोठ्या आवडीनें, भक्तिभावानें, एकनिष्ठेच्या विश्वासानें ज़र घेऊं लागलांत, तर आपले जनार्दन महाराजांचे एकनाथ आश्वासन देताहेत कीं, तुमच्याबद्दल परमेश्वराला सांकडें पडेल, तो तुमचा भार घेईल. मायबाप, या भक्तिमहात्मांत ईश्वर नामाचें महत्त्व अतिशय म्हणजे अतिशयच आहे, यज्ञ यागें, जप तप, मंत्र तंत्र होम अनुष्ठान, आसनें साधनें व मुद्रासमाधी, वारी पालखी, दिंडी, वगैरे न करतां वाल्या कोळ्यासारखा वाटमाऱ्या नुसत्या नामानें वाल्मिक ऋषी झाला. अजामीळ, गणिका सद्गतिला मिळाली, संतजनहो, या नुसत्या नाममंत्रानें पावन झालेल्या कित्येकांचे दाखले पुराणांत, ग्रंथांत जमा आहेत.

जर असें आहे तर मग जीव नसत्या व्याधिउपाधी कां बरें मागें लावून घेतो ? विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सोपा सुलभ सरळ व अगदीं सहज घडणारा खात्रीचा हा राजमार्ग सोडून जीवाला व्याधीउपाधींच्या खटाटोपांत पाडण्यांत मानवी प्राणी काय साधतात. विचार करा. बावरलेल्या चित्तानें हें करूं का तें करूं असें होऊन, भांबावलेल्या स्थितींत विकाराच्या आहारीं जाऊन माणूस कुणाच्यातरी आहारीं जातो आणि त्याच्या सांगण्याप्रमाणें तो कर्मे आचरूं लागतो. सुरवात छान होते. सुरवाती सुरवातीला माणूस ह्या सगळ्या गोष्टी जीव लावून, मन लावून करण्याचा प्रयत्न करतो. त्याची इच्छा असते कीं, आपल्याकडून हें व्यवस्थित व्हावें ! पण संसारी माणसाला, यासाठीं लागणारी, हवी असणारी, शांतता, एकांत, मनःस्वास्थ व्यवहारिक व कौटुंबिक परिस्थिति नेहमींच मिळते असें नाहीं. म्हणजे मग पुढें पुढें आपोआप या दैनिक जपजाप्यांत, आसन मुद्रेंत, मंत्रजपांत, शैथिल्य येऊं लागतें, आणि शेवटीं शेवटीं मनाच्या द्विधा स्थितींत माणूस इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टः होऊन, पुन्हां पूर्वपदावर येतो, सर्व सोडून देतो.

हा अनुभव पुष्कळांचा असेल !

हें सगळें पूर्णपणें विचारांत घेऊनच आमचे संतसाधू आपल्याला हा नाम मंत्रांचा सोपा उपाय सांगून गेले आहेत; " **मार्ग दावूनी गेले आधीं । दयानिधी संतपुढें ॥ तेणेंची पंथें चालों आतां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥** (निळोबा) केवढा उपकार केलाय् बरें या संत लोकांनीं आपणांवर; विनामूल्य, विनाखर्च, आणि सहज साध्य मार्ग त्यांनीं आम्हांला दाखवून दिला. " **असाल तेथें करा नामाचें चिंतन । याहूनी साधन अन्य नाहीं ॥** " परमेश्वराचें नांव घ्या, ईश्वराचें नांव घ्या, श्रीहरीचें स्मरण करा, दिवसाच्या चोविस तासांपैकीं चोविस मिनिटें नव्हे चोविस सेकंद जरी परमेश्वराचें एक मनानें चिंतन केलेत तरीसुद्धां ' **सोडविल माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारीं केली आम्हीं ॥ अवघे काळीं वाचे म्हणा नारायण । सेना म्हणे क्षण जाऊं न द्या ॥** ' एवढ्या भगवन्नाम चिंतनाच्या भांडवलावर ह्या संसार सागरांतून, तो परमपावन, परमकृपाळू, परमवत्सल श्रीभगवान, तुम्हांला खात्रीनें सोडविलच सोडविल असें आमचे सेना महाराज प्रतिज्ञेवर सांगतात; आणि हें पुराणांत पाहिलें असतां आपणाला सत्य असें पटतें. समुद्र मंथनांतून निघालेलें हलाहल, ज्यानें जगाला हैराण करून सोडलें, जगाचा ताप हरण करण्यासाठीं बिचारें भोळें दैवत श्रीशंकर पुढें सरसावलें आणि तें जळजळीत विष त्यानें पिऊन टाकलें. ' विश्वाला ' जाळून टाकण्याची ज्याची शक्ति, त्या हलाहलानें श्रीशंकराच्या अंगाचा दाह होऊं लागला, दाह थांबेना, शेवटीं शंकरानें ईश्वराचा धांव आरंभिला. अतिबिकट परिस्थितीं उत्पन्न झाली, इलाज राहिला नाहीं, मार्ग दिसत नाहीं असें झालें कीं, नेमका रामच आठवतो, इतर देवांची आठवण होत नाहीं. सांगावयाचें तात्पर्य एकच कीं, कशाही परिस्थितींत रामनाम म्हणजे अचूक गुणकारी रामबाणच होय. नुसत्या रामनामानें दाह शांत झाला.

कढईभर ततेलांत लोटलें जात असतां परमेश्वराचें नाम जपणारा प्रल्हाद कांहींही दुखापत न होतां वांचला; कड्यावरून ढकलून दिला असतां भगवन्नामचिंतनांत मग्न असणारा प्रल्हाद भूमाता हाताचा पाळणा करून अलगत झेलते. नामाचें महत्त्व हें असें आहे.

**॥ ऐसे माझेनी नाम घोषें । नाहींची करीति विश्वाचीं दुःखें ॥**
**॥ अवघे जगचि महासुखें । दुमदुमीत भरलें ॥** ज्ञाने० अ. ९ या. ओ. २००.

नामाचा महिमा एवढा मोठा आहे कीं, अमरपुरीचे, स्वर्गीचे देव ते सुद्धां नामामृताची गोडी चाखण्यासाठीं या मृत्युलोकांत येऊं इच्छितात.

**॥ स्वर्गीचे अमर इच्छितातीं देवा । मृत्युलोकी यावा जन्म आम्हां ॥**
**॥ नारायण नामीं होऊं जीवनमुक्त । कीर्तनी अनंत गाऊं गीति ॥**

इतकें ज्या नामाचें महत्त्व आहे तें घेण्यास कांहीं विशिष्ट काळवेळ लागतो का ? नाहीं. " काळवेळ नाहीं नाम उच्चारितां. "

अगदीं सहज **" अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां "**
**" सदां देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळीतां "**
**" घरीं दारीं शय्येवरी रतिसुखाचे अवसरी "**
**" समस्तांची लज्जा त्यजुनी भगवच्चिंतन करी "**

( वामन पंडीत )

नाम उच्चारण्यास काळ वेळ स्थळ याचें बंधन नाहीं, मर्यादा नाहीं, वाटेल तेव्हां, वाटेल तेथें, येईल तसें, पण " अंतरीं आवडी " धरून हरिचें नाम घेण्यास प्रतिबंध नाहीं. नाम घेण्यास प्रपंच सोडण्याची जरूरी नाहीं, उलट प्रापंचिकाला तर अधिक संधी मिळते. या संधीचा योग्य उपयोग मात्र जिवानें करून घेतला पाहिजे.

" **शाश्वत सुखासाठींच जीवाची खटपट आहे.** संसारीजन संसार करून हे सुख शोधीत आहेत, संन्याशी सर्वसंगपरित्याग करून हेंच धुंडाळीत आहे. सर्व सत्ताधारी सार्वभौमराजा याच्याच विवंचनेंत आहे आणि फुटक्या कवडीलाही महाग असलेला, रस्तोरस्तीं भटकणारा भणंगभिकारी सुद्धां सुखाच्याच शोधांत आहे. तें सुख कुठें हरवलें आहे ! तें अचूक सांपडेल असा नेमका पत्ता दाखविणारा व उपाय सांगणारा कोणी असेल का ? आहे, आहेत, नक्की आहेत.

संसारिक व्याधी उपाधिनी जर्जर झालेला जीव विसाव्यासाठीं, विरंगुळ्यासाठीं परमेश्वराकडे धांव घेतो, देवाचें नांव घेऊं लागतो. असें नांव घेतां घेतांच मनाला प्रभुचरणाची गोडी लागते. आस्ते आस्ते नामस्मरणाचा उद्योग प्रेमांत होऊं लागतो. सुखाची अंधुकशी झुळक जीवाच्या अंगावरून जाऊं लागते.

हरएक जीवाचें अंतिमध्येय सुखच आहे. जीवमात्राची धांवपळ, आटापीट व धडपड त्याच्या इच्छित सुखाच्या साधनेंसाठींच आहे, आणि नेमकी हीच गोष्ट जीवित

अत्यंत कष्टमय होण्यास कारणीभूत होते. ज्याच्यामागें आपण लागावें तें जीव घेऊन पुढें पळतच असतें, हें नेहमींच्या व्यवहारांत आपण अनुभवतो म्हणून अक्षय्य सुख हें अंतिमध्येय ठेवण्याचें सोडून नुसतें सुख हेंच परमध्येय आपल्यापुढें ठेवल्यानें, मनुष्याच्या जीविताची उभारणी अस्थिर व कृत्रिम बनली, आणि म्हणूनच मानवप्राणी अंतरीच्या जीवीच्या शुद्ध प्रेमाला पारखा होऊन, खरी भक्ति, खरें प्रेम, सदाचार वगैरे सर्व गोष्टी निव्वळ काल्पनिक ठरल्या जाऊन, दंभाचें, ढोंगाचें बडेजावीचें वर्तन घडूं लागलें. आणि असें होतां होतां अधर्म माजूं लागतो. चुकीच्या, दंभाच्या, ढोंगाच्या आचाराचें प्राबल्य वाढल्यामुळें परमेश्वरी अस्तित्वाबद्दल, माणसांच्या मनांत शंका उत्पन्न होऊन माणूस चमत्कारापुढें नमस्कार करायला धजतो, आणि अशांतच बुवाबाजीचा उगम होऊन ढोंग्यांचें चांगलेंच साधतें. असो.

हें सगळें डावलून ईश्वर नामस्मरणाची स्मरणी हातीं घ्या. पण ईश्वर भजनाकडे मन जायला सुद्धां " बहूत सुकृताची जोडी " असल्याशिवाय; अनंत जन्मांचे पुण्य संचयास असल्याखेरीज कसें जमावें ?? नाहींतर कितीतरी या मार्गाकडे वळले असते. बळकट पुण्याचा सांठा, कैकजन्मांतरी जोडलेला पुण्याचा ठेवा, या मार्गाकडे मनाची प्रवृत्ति नेतो.

संसारद्वारां परमार्थ साध्य करून कसा घ्यावा या बाबतची शिकवण देण्याची बहुमोल कामगिरी कुणीं तरी केली आहेच. हें कुणींतरी कोण असावेत ?

**" यदायदाहिधर्मस्यग्लानिर्भवतिभारत । अभ्युथानमधर्मस्य तदात्म्यानं सृजाम्यहम् "**

खऱ्या धर्माची ग्लानी होत असतां, ईश्वर मनुष्य रुपानें अवतार घेतो. आमचा भारत, किंबहुना आमचा महाराष्ट्र ज्या कित्येक अवतारांच्या चरण धुळीनें पावन झाला आहे; ते साधुसंत.

आपले समर्थ साईबाबा हे असेच अवतारी म्हणजे ईश्वर होत. हे काय शिकवितात ?

जन्मतां ज्ञानी पण जगाच्या अफाट पसाऱ्यांत भांबावलेल्या मानवी जिवाला भोळ्या, भाबड्या, निरलस, निरपेक्ष, निःस्वार्थी नामभक्तीच्या जोरावर ईश्वरी कृपा कशी करून घ्यावी, हेंच.

आपल्या आचरणानें, आपल्या उपदेशानें, आपल्या सहज बोलण्यानें ते हें कार्य करीत असतात; आणि हें करतांना तुमचा भाव कुठें एकनिष्ठ होतो, तें पहात असतात. भावांत एकनिष्ठता झाली कीं, कार्य सफल झालें.

भावपूर्ण नामामृतानें तृप्त झालेली माऊली,

**ऐशी जो माझी पूजा करी ।**
**तो मज पढियंता गा भारी ।**
**मी सर्वांगें राबे त्याच्या घरीं ।**
**तो मजवर मिराशी ॥**

असा कबुलीजबाब लीहून देते.

नामानें सर्व तरले, नामानें पैलतीर गांठलें, नामासारखें सुलभ साधन नाहीं. " तीर्थांचें पै तीर्थ। नाम हें समर्थ। होईल कृतार्थ। रामनामे तीर्थांकडे जावें लागतें, तीर्थांत वेळीं अवेळीं बुडून मरण्याची तरी धास्ती असते प्रण नामाच्या साधनांत कशाचिही भीति नाहीं. इतकें सोपें आणि सुलभ, पण योगयागाहून, साधनतीर्थाटणाहून अधिक योग्यतेचें दुसरें साधन नाहीं. जिवास हें फुकटचें लाभलें आहे. " नाम फुकट चोखट " असतांना जीव जर भलत्या व्याधीं उपाधींत गुंतून राहील, तर त्याची इतःभ्रष्टस्ततोभ्रष्टः अशी अवस्था होणारच.

नामसाधनानें ऋद्धिसिद्धि भुक्तिमुक्ति, विरक्तिसमाधि, सर्व कांहीं साधते, एवढी नामाची योग्यता संतांनीं जाणली, आणि हाच, एवढा सोपा सरळ, फुकटचा रस्ता त्यांनीं भाविकांना दाखवून दिला.

**आणि म्हणूनच संतांची योग्यता सर्व श्रेष्ठ आहे.** आपण सर्वांनीं त्यांचे चरणीं लीन झालें पाहिजे.

आपले दासगणू महाराज श्री साईनाथ स्तवन मंजरीमध्यें म्हणतात "

**संत सूर्यनारायण। कृपा त्यांची प्रकाशपूर्ण।**
**संत सुखद रोहिणी रमण। कौमुदीती तत्कृपा ॥ ८० ॥**

**संत कस्तुरी सोज्वळ। कृपा त्यांची परिमळ।**
**संत इक्षु रसाळ। रसनव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥**

**संतसुष्ट दुष्टांप्रति। समसमान निश्चिति।**
**उलट पाप्यावरी प्रीती। अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥**

**आम्हीं जन हे संसारी। मळत आहोंत वरच्यावरी।**
**म्हणून आम्हींच अधिकारी। संतदर्शन घेण्यास्तव ॥ ८३ ॥**

**तुमच्या कृपेविण पाही। जगांत बरें होणें नाहीं।**
**अर्जुनाला शेषशाई। सखा लाधला धर्मास्तव ॥ ९२ ॥**

**सूग्रिव कृपेनें बिभिषणा। लाधलासे रामराणा।**
**संतामुळेंच मोठेपणा। लाधला श्रीहरिसी ॥ ९३ ॥**
**ज्यांचें वर्णन वेदासी। न होय ऐशा ब्रह्मासीं।**
**सगुण करवून भूमिसी। लाजविलें संतांनिच ॥ ९४ ॥**

**दामाजीनें बनविला महार। वैकुंठपति रुक्मीणीवर।**
**चोखोबानें उचलण्या ढोर। राबविलें त्या जगदात्मया ॥ ९५ ॥**

**संतमहत्त्व जाणून। पाणिवाही जगज्जीवन।**
**संत खरेच यजमान। सच्चिदानंद प्रभुचे ॥ ९६ ॥**

अशा या संतांच्या चरणीं नम्र होऊन भाविकतेनें जर परमेश्वर नाम संकीर्तनांत मनाला गुंतवून ठेवलेंत तर, अफाट, अतर्क्य, अनुल्लंघनीय वाटणारा हा संसारसागर, सहज सहज तरून जाल, इतकेंच नव्हें तर

**देवाऐसे देवची होती, जे या भजती विठ्ठला ॥**
**ऐसा याचा प्रताप ठसा । प्रगटे सरसा, नामजपे ॥**

उलट **नामासी विन्मुख तो नर पापिया ।** असे ज्ञानोबाराय हरि पाठाच्या दहाव्या अभंगांत सांगताहेत;

जो नामापासून आपलें मुख फिरवतो, जो हरिनामाला विन्मुख झाला, ज्या परमेश्वरानें हें मुख दिलें, वाचा दिली, त्या मुखानें त्या वाचेनें, त्या परमेश्वराचें नामसंकिर्तन केलें नाहीं, त्याचें चिंतन केलें नाहीं, त्याचे स्मरण केलें नाहीं, त्याची आठवण केली नाहीं, तर त्या पापाला तोड आहे काय ?

कलियुगांत, आयुष्य किती क्षणभंगूर आहे याचा विचार केला असतां, जो मार्ग किंवा जें साधन, सुलभ यातायातिशिवाय असलेलें जिवाला खटाटोपांत न पाडणारें, वेड्यावांकड्या वळणांत न नेणारें, कोणत्याही बंधनांत न अडकविणारें, असलें साधन संतांनीं आपणांपुढें ठेवलें असून, त्याला फुकटचें समजून बाजूंला सारून यज्ञ, याग, जप, तप, होम हवन यांच्या यातायातींत पडायचें ?

"यज्ञयागजपतपासी न भुले असा परमेश्वर" ध्यान धारणें ना कळे "असा देव, होमहवनादिकांनीं" न गवसणारा ईश्वर, तुमच्या भावयुक्त, भक्तियुक्त, प्रेमयुक्त, नामचिंतनानें तुमचा होतो, याचा दाखला कोणत्याही धार्मिक ग्रंथांत पानो पानीं सांपडेल.

( १ ) शबरीचीं बोरें रामप्रभूला प्रीय झालीं.
( २ ) चोखा मेळ्यासाठीं देऊळ फिरलें.
( ३ ) सुदाम्याची नगरी सोन्याची झाली.
( ४ ) दामाजीसाठीं महार झाले.
( ५ ) सांवत्याची भाजी खुडली.
( ६ ) जानाबाईचें दळण दळिलें.
( ७ ) सखुबाईसाठीं प्रति सखु बनले.
( ८ ) अर्जुनाचीं घोडीं धुतलीं.
( ९ ) प्रल्हादासाठीं स्तंभांत गुरगुरले.
( १० ) सजन कसाईचे दुकानीं मांस विकलें.
( ११ ) पांडवांचें शेवटपर्यंत सहकारित्व केल.
( १२ ) वाल्या कोळी वाल्मिक झाला.
( १३ ) मीराबाई विष प्याल्या.

अशीं कितीतरी उदाहरणें दाखवितां येतील.

आपल्या बापुगीरचा–डॉक्टरनें हात टेकले–ताप बाबांनीं कसा घालविला

या सर्व गोष्टी व्हायला कारण काय ? तर त्या सर्वांचा शुद्ध, एकनिष्ठ, सात्विक भाव आणि प्रभूवरील अढळ, अचल विश्वास.

मनाची प्रभुचरणीं एवढी एकात्मता होण्यासाठीं योग्य सद्गुरूचें मार्गदर्शन हवें. संत कृपा हवी. संतांचा अधिकार केवढा !!

ह. भ. प. दासगणू महाराजांनीं श्रीसाई स्तवन मंजरींत "**संत खरेच यजमान, सच्चिदानंद प्रभुचे**" लिहिलेलें आपण वाचलें असेलच. "राम" म्हणण्याऐवजीं "मरा" जपणारा वाल्या कोळी रामजन्मापूर्वी रामायण लिहितो, आणि अवतारधारी प्रभूला त्याच्या लिखाणाबरहुकुम वागावें लागतें !

भक्तियुक्त अंतःकरणाच्या नाम जपाचा हा केवढा अधिकार ! केवढी सत्ता !! वाल्या कोळ्याला गुरु नारद मिळाले. "गुरूवचनीं ठेवितां भाव आपोआप भेटे देव" गुरूच्या वचनावर ठेवलेल्या निव्वळ विश्वासानें केवढें जबरदस्त कार्य केलें !!!

नामदेव महाराजांच्या बरोबर श्रीपांडुरंग बोलत असत. पण श्रीविसोबा खेचराकडून मार्गदर्शनाचा अनुग्रह मिळतांच "कोरड्या रोट्या कैशा खाशी" म्हणत तुपाची वाटी हातांत घेऊन नामदेव कुत्र्यामागें लागला. प्रभूची ओळख करून देण्यास भाविकतेनें होणारा नामजप अवश्य आहे; मात्र तो प्रेमानें आवडीनें होत असला पाहिजे. हें प्रेम, ही आवडी, सद्गुरूच्या, संताच्या मार्गदर्शनाशिवाय उत्पन्न होणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर भक्तीचा उदय होण्यास गुरूकृपेचें अधिष्ठान असलेंच पाहिजे.

यासाठीं गुरूला शरण गेलें पाहिजे. मात्र तो सद्गुरु म्हणजे सत् + गुरु असला पाहिजे. भंपकबुवा नको, अगर वेषधारी बाबा नको किंवा वाक्पांडित्यानें भुरळ पाडणारा पुस्तकांतला किडा नको. तर प्रत्यक्ष अनुभवाचें ज्ञानांजन घालणारा स्वतः ईश्वर प्रेम-कल्लोळांत बेधुंद असणारा भक्त असला पाहिजे." लोकांसांगें ब्रह्मज्ञान आणि आपण नर्मदेंतल्या गोट्याप्रमाणें कोरडा ठणठणीत. असल्या बुवांचें पेव फुटलें आहे सध्यां. असल्या लोकांना नीट पारखून त्यांच्यापासून सावध असावें. असो.

**त्रिवेणी संगमीं नाना तिर्थीं भ्रमीं चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ ॥**

तीर्थाला गेले आणि जर मन बरोबर नेलें नाहीं, तें ठेवलें मागें संसारांत, तर काय उपयोग तीर्थाला गेल्याचा ? "बाई मी जाते शिंगणापूरा । माझी शेळी जतन करा" असें करून तीर्थाला अगर क्षेत्राला जाण्यांत काय साधणार ? संसाराचे विषय तीर्थांतील बुडीबरोबर जर वाहून गेले नाहींत तर परमेश्वराकडे मन कसें लागणार ?

यापेक्षां सोपा सरळ उपाय महाराज सांगतात तो म्हणजे "असाल तेथें करा नामाचें चिंतन । याहूनी साधन अन्य नाहीं" "नामाची आठव हेंची सोपें वर्म" वगैरे. म्हणजे परमेश्वर नामचिंतन करा.

ही नामाची योग्यता आहे म्हणून सगळ्या संतशिरोमणींनीं ही अचुक गुणकारी पेटंट औषधाची सुरई आपणांपुढें ठेविली आहे. फक्त मन शुद्ध ठेवण्याचें पथ्य संभाळलें

पाहिजे. वाऱ्यावर इतस्ततः भटकणाऱ्या मनाला थाऱ्यावर ठेवण्याचें पथ्य पाळलें पाहिजे. औषध सोपें पण पथ्य महाकठीण; अतिजड.

**सद्‌गुरूची आवश्यकता इथें आहे.** त्याचे पाय धरा, मनाला ठिकाणावर आणण्याचा मार्ग तेच दाखवितील. सदगुरूचे पाय एकदां मिळाल्यावर अशीं शेंकडो तिर्थें ह्या चरणांत सामावलेलीं असतात. काय करायचें मग तीर्थाला ?

आपणांपैकीं बहुतेकांना आठवत असेल, दासगणू महाराजांसाठी श्रीबाबांच्या आंगठ्यांत गोदावरी आली. संताच्या पायांवर; सद्‌गुरूंच्या चरणावर; तीर्थें लोटांगण घालीत येतात हें आजच्या चालू कलीयुगांतलें सत्य.

पुराणांतल्या त्या गप्पाच म्हणणाऱ्यांनीं या सत्याकडे जरा लक्ष्य द्यावें.

राजापूरकर मंडळी पुंडलिक नाटक करीत असे. त्या नाटकामध्यें आजलाही पवित्र मानल्या जाणाऱ्या गंगा, यमुना, सरस्वति इत्यादि नद्या श्रीकुक्कुटस्वामींच्या दर्शनानें, पुजनानें पूनीत होण्यासाठीं आलेल्या दाखविल्या आहेत. नाट्यप्रसंग सोडून सत्य कायतें घ्यायचें झाल्यास, संतांच्या, सद्‌गुरूंच्या चरणांजवळ सकळ तीर्थें वास करीत असतात, हेंच मिळेल. म्हणून माझ्या बाबांजवळ, माझ्या श्रीसाईनाथाजवळ, एकनिष्ठेनें एकदीलानें, शुद्ध मनानें या कल्पविकल्प सोडून द्या आणि "**सकळ तिर्थें जयाच्या पायीं। तो हा सुलभ श्रीसाई। आवडीनें धांव घेई। भक्तरक्षणा कारणें**" माझा साईनाथ तुमची दृष्टी, चित्त, मन व ईश्वरनाम याची अशी सांगड घालून देईल कीं आपण नामापासून कधींही च्युत होणार नाहीं. मात्र आपण आपली कांस बळकट घातली पाहिजे. निष्ठा, श्रद्धा व सबुरी–रोमरोमांत खेळत ठेवली पाहिजे. माझ्या मतें यापेक्षां त्रिवेणी संगम म्हणून जो म्हणतात तो निराळा नसावा! हा त्रिवेणी संगम–म्हणजे निष्ठा, श्रद्धा व सबुरी ज्यानें साधला त्यानें सर्व मिळविलें. माझा, साई अवतारांत प्रगट झालेला द्वारकाधिश त्याला जवळ करील इतकेंच नव्हे तर भक्तीला भुललेला नारायण अशा भक्तांचा भाट होईल.

**भाविकांशीं पावे। मागे मागे त्याच्या धांवे ॥ १ ॥**
**चौऱ्यांशीं लक्षयोनी फिरता। अवचट नरदेह ये हाता ॥**

देवानें जीवास नरदेहाला पाठविलें. शिल्पकाराची शिल्पकता येथें पूर्ण झाली. या देहांतच, या योनींतच जीवाला बरें वाईट ओळखण्याची शक्ति आली. परमेश्वरानें श्रीसाई प्रभूनें जीवावर केलेला हा केवढा प्रसाद !!!

जिवाची मालकी देवाची, सत्ता देवाची, अधिकार देवाचा. ज्या देवानें जीवाला या दुनियेच्या बाजारांत सोडून दिलें, तो देव जिवाकडून कसली अपेक्षा करीत असेल! आणि जीव देऊन देऊन तरी देवाला काय देणार!! आणि एक त्याच्या नामाचिंतनापलिकडे जीवानें त्याला देण्यासारखें कोणतें साधन जिवाजवळ आहे !

जिवा, एवढेंही तुझ्यानें होऊं नयेना ?

देवाचेंच नामचिंतन शुद्ध प्रेमानें व्हावें हीच देवाची इच्छा !!! नामचिंतन, नाम. नाम काय करूं शकतें ? उद्धव, प्रल्हाद, वाल्मिक, अजामिळ, गणिका, मीराबाई, सुरदास, कबीर, संतश्रेष्ठ श्रीतुकोबाराय यांच्या चरित्राकडे विचारपूर्वक नजर टाकली तर या प्रश्नाचें उत्तर मिळतें. केवढा मोठा नामाचा परिणाम ! ज्या नामानें सागरीं पाषाण तरले, त्या नामानें जिवाला हा भवसिंधु तरणे सुलभ नाहीं काय ?

नामासरखें सुलभ, सोपें, सर्वांना सर्व काळीं फुकाचें असें दुसरें साधन नाहीं. नाम जरी फुकाचें असलें तरी त्याची गोडी लागण्यास **संतसंग हवा.** असो.

देवाची इच्छा कीं जिवानें त्याचें चिंतन करावें !

**म्हणोनी हा नरदेह निर्मून । ईश्वर झाला आनंद संपन्न ॥**
**कीं विवेक वैराग्यातें वरून । नर मद्भजन करील ॥** साईसच्चरित ५२।८.

ज्या देवानें तुम्हांला या नरदेहाला आणून सोडलें त्या देवाची एवढी एकच इच्छा पुरी करण्यासाठीं आपण काय कराल ?

ज्या नामापासून शुद्ध प्रेम मिळतें तें नाम घ्या. आणि नामाची गोडी संतसंगाशिवाय लागणार नाहीं, म्हणून संतसंग करा. सद्गुरु श्रीसाईनाथाला, माझ्या पांडुरंगाला, माझ्या विठोबाला शरण जा आणि मग " असाल तेथें करा नामाचें चिंतन " या पलिकडे दुसरें कसलेंही साधन नको; मग " सोडविल माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आम्हीं ". निष्ठा, श्रद्धा व सबुरी असूंदे.

या एवढ्या सोप्या उपायानें देव गांठता येईल. सप्ताह, यज्ञ, याग, जपतपादि साधनांच्या भरीस पडून जीवानें इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः होऊं नये म्हणूनच अंतःकरणाच्या कळवळयानें संत माऊलींनीं एकच गोष्ट सांगितली ती ही कीं, ज्या प्रेमानें जीव देह घेऊन आला, त्या प्रेमानें, त्यानें जगन्नियंत्याचें स्मरण करावें, चिंतन करावें, परमेश्वरी प्रेमानंदांत समरस व्हावें, हेंच या जिवाचें मुख्य काम आणि मुख्य धर्म.

**जीवानें हेंच जर चुकाविलें तर देवाची** गांठ कशी पडावी, हें योग्य तऱ्हेनें समजावून देण्यासाठींच देव संतरूपानें अवतरतात.

संतमाऊली ज्ञानोबाराय, तुकाराम, साईनाथादि सर्व हेंच कार्य करण्यासाठीं या जगांत आले, व जिवानें परमेश्वराला कसा गांठावा, याबद्दल ज्ञानभांडाराची किल्ली त्यांनी भाविकांच्या हवालीं केली.

तेव्हां जिवानें हा मार्ग सांपडण्यासाठीं भाविक बनलें पाहिजे.

**नलगे यासी कांहीं मोल । वेंचिता बोल फुकाचे ॥ धृ० ॥**
**विठ्ठल विठ्ठल वदतां वाचे । नोहे आणिकांचें कारण ॥ १ ॥**
**नाचा प्रेमें वाळुवंटी । घाला मिठी संतासी ॥ २ ॥**

( एकनाथ महाराज )

एकनाथ महाराजांनीं संतांच्या पायीं मिठी घाला हेंच उपदेशिलें, कारण संतांजवळ गेल्याशिवाय हरीची आवडी कळणार नाहीं, ओळख तेच पटवून देतील, संतांवर विश्वास पाहिजे. एवढें झालें म्हणजे मग परमेश्वर म्हणतो—

'या लागीं पापयोनी ही अर्जुना । कां वैश्य शुद्र अंगना ।
मातें भजतां सद्ना । माझी या येती ॥
तयांचें आम्हां व्यसन । ते आमुचें निधिनिधान ।
किंबहुना समाधान । ते मिळति तैं ॥
दों वरी दोनी । भुजा आलों घेऊनी ।
आलिंगावया लागुनी । तयाचें आंग ॥ (ज्ञानेश्वरी)

नाममहात्म्य हें असें आहे.

(१) नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥
(२) नाम नावडे ज्याची वाचा । तो लेक दो बापाचा ॥
हेचि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥
(३) निळा म्हणे पाप मुख्यतेची साचें । नावडे देवाचें नाम मुखीं ॥
(४) रामकृष्ण नाम अनंत राशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥
(५) नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । कृष्ण नामीं संकल्प धरूनी राहे ॥
(६) नित्य नाम वाचे तोचि एक धन्य । त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं ॥
राम नाम कीर्ति नित्य मंत्र वाचे । दहन पापाचें एका नामें ॥
(७) तें नाम सोपेरें । रामकृष्ण गोविंद । वाचेसि सद्गद जपे आधीं ॥
(८) संतांचे संगतीनें समज । ध्यानीं आणुनी पुरते उमज ।
अनुभवावीण मान हालवूं नकोरे ।
हरि भजनावीण काळ घालवूं नकोरे ॥
(९) नामाचा आठव हेंची सोपें वर्म । अवघे कर्माकर्म पारुषति ॥
या परते साधन आन कांहीं नेणें । अखंड वाचे म्हणे रामकृष्ण ॥
सुलभ हा मंत्र तारक जीवासी । येणें भवासी उतार होय ॥
चोखा म्हणे मज सांगितलें कानीं । रामकृष्ण वाणी जप सदा ॥
(१०) हरि हरि हा मंत्र शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥
(११) नामा म्हणे नाम महाजप परम । शंकरासी नेम दीन निशीं ॥
(१२) वेदशास्त्रप्रमाण । श्रुतीचें वचन । एक नारायण सार जपा ॥

परमेश्वर नामाबद्दल साधुसंतांचे हे अमोल उपदेशाचे चिरंजिव बोल ! आपणां सर्वांनीं या चिरंजीव बोलाचें पारायण, चिंतन करावें; म्हणजे विठ्ठल कांहीं दूर नाहीं. आपला निश्चय, आपला भाव बळकट असला पाहिजे; विश्वास, श्रद्धा दृढ असली पाहिजे मग

" आधिं दृढ करा भाव । मागे पहा उभा देव "

परमेश्वराच्या चरणीं दृढ भाव ठेवलात तर परमेश्वर तुमच्या हांके–शब्दाला हजर. मग मोक्ष मोक्ष म्हणजे काय गोष्ट आहे आणि याबद्दलचा कबुलीजबाब खुद्द परमेश्वरच गीतेच्या अठराव्या अध्यायाच्या ६६ ठाव्या ओवींत देतात. ती ओवी अशी–" **सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहंत्वा सर्वपापेभ्योमोक्षयिष्यामि माशुचः ॥ ६६ ॥**

तसेंच मला भेटायची इच्छा धरणाऱ्यांना बुद्धि आणि श्रद्धा या दोन वाटाखेरीज तिसरा मार्गच नाहीं असेंही म्हणतात. म्हणजे आज आपणां भाविकांना जर मुख्य काम कुठचें असेल तर परमेश्वराला आस्तिक बुद्धीनें, श्रद्धामय अंतःकरणानें नामस्मरणाच्या उपायानें प्रसन्न करून घेणें हेंच. नको तीर्थाटणें, नको वाऱ्या, नको यज्ञयाग, नकोत तीं हवनें पुजनें, फक्त एक भावानें हरिस्मरण. जन्माचें सार्थक त्यांत आहे.

तीर्थाटणें, वाऱ्या करून, यज्ञ याग, होमहवन करून जर मनाच्या खोड्या जाऊन ईश्वरी श्रद्धा वाढत असेल तर उत्तम, पण देहांत असणाऱ्या कुवासनांचा पोष करून निव्वळ क्षेत्रास जाण्याचा देखावा करण्यांत कांहीं उपयोग नाहीं. ईश्वरी भावाची निष्ठा आंगीं बाणल्यावर तीर्थाटनास जाण्याचें कारणच नाहीं.

" काय करिशी काशी गंगा । भीतरीं चांगा नाहींतो "

पण इतकें कशाला ? " ठायींच बैसोनी करा एक चित्त " सर्वशक्तिमान परमेश्वर सर्व ठिकाणीं आहे व आपली बरी वाईट कर्में पहाणारच ही एकदां समजूत झाली कीं, मग हे बाह्य व्याधी उपचार आपोआप बंद पडतीलच.

परमेश्वर प्राप्तीचें मार्ग निरनिराळ्या युगांत निरनिराळे सांगितले आहेत. सत्य युगांत ध्यान, त्रेतायुगांत यज्ञ यागादि कर्में, द्वापार युगांत पूजाअर्चा व कलीयुगांत या सर्व साधनांत सोप्यांत सोपें असें असून " **हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैम केवलम् । कलौनास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥** हें व्यासांनीं सांगितलें आहे.

तेव्हां आपण संसारी जनानीं एवढेंच लक्ष्यांत ठेवायचें कीं, संसारांत राहून परमेश्वर चिंतन करून, नामस्मरणानें, जन्माचें सार्थक करायचें कसें साधायचें हें ? आहे यालाही उपाय आहे.

संसारद्वारा परमार्थ साध्य करून घ्यायचा तो कसा ? याबद्दलची शिकवण देण्याची बहुमोल कामगिरी या संतांनीं केली आहे. तेव्हां या साधुसंतांच्याच जवळ गेलें पाहिजे. जातांना एका सद्भावनेशिवाय कसलेंच गांठोडें न्यायचें नाहीं.

पुढें " **संतांचे संगतीनें समज । ध्यानीं आणुनी पुरते उमज ।** आपणच आपल्या विवेकी व चिकित्सक बुद्धीनें योग्य गुरूची निवड करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें परमेश्वराचें चिंतन कसें करावें याचें मार्गदर्शन घ्यावें.

आणि मग आपोआपच

**होय अंतरी पालट । करितां पाठ हरिनामें ॥**
**देवा ऐसे देवची होती । जे या भजती विठ्ठला ॥**
**ऐसा याचा प्रताप ठसा । प्रगटे सरसा नामजपें ॥**
**निळा म्हणे लटकें नव्हे । । पहा स्वानुभवें आपुलिया ॥**

असें होईल.

मात्र, सावधगिरी जर कुठें घ्यायची असेल तर ती सद्‌गुरु निवडण्यांत

हल्लीं या गुरुबाजीचा धंदा जरा तेजींत आलेला आहे. जो उठतो तो तो साक्षात्कार झाल्याचें सांगून मोकळा. साक्षात्कार इतका सवंग आहे का हो ? असो. मला सांगावयाचें तें एवढेंच कीं, सद्गुरू सांपडणें इतकें सोपें नाहीं. यापेक्षां पूर्वीच्या साधुसंतांनीं आपल्या पाठीमागें ठेवलेल्या अमोल ग्रंथांचेंच शिष्यत्व पत्करावें. श्री ज्ञानेश्वरी, श्री तुकोबारायांची गाथा, श्री दासबोध, श्री साईचरित, वगैरेसारख्या ज्ञान-सरितेनें तुडुंब भरलेल्या अजोड ग्रंथांच्या अभ्यासानें मनाला शुद्ध करून विवेक बुद्धीला जागृत करा. भक्तियुक्त अंतःकरणानें त्यांना शरण जा. प्रयोपवेशन करून ठाण मांडलेल्या म्हातारीला आपल्या बाबांनीं काय सांगितलें माहित आहे; "गुरूनें फुंकले न माझे कान, तुझे मी कैसे फुंकरूं"

तेव्हां सांगण्याचें तात्पर्य काय तें ध्यानांत आणून भोंदु बाबा, बुवा, वगैरे पासून सावध राहा. आणि फक्त शुद्ध भाविक बनून ईश्वराचें नामचिंतन करा, हरिस्मरण करा. बस्स एवढें तुम्हीं केलेंत कीं पुष्कळ झालें.

**देवा कारणें भाव तत्सम । द्यावें न लागे धनवित्त ।**
**जालें एक चित्त तरी बहुत । एवढ्यासाठीं नका करूं वाताहात ॥**

असें श्रीसंतशिरोमणी तुकोबाराय सांगताहेत.

मानवी जीवित म्हणजे किती क्षणभंगुर ! बोलून चालून अळवावरलें पाणी. दिवसेंदिवस क्षणोंक्षणीं मिनीटामिनीटाला सेकंदसेकंदाला काळ त्याला ग्रासीत चालला आहे. याची खुणगांठ मनाजवळ बांधून जिवाचा जेवढ्यांत जेवढा चांगला उपयोग करून घेतां येईल तेवढा घ्यावा. तन, मन सत्कारणीं लावावें. जन्माचें सार्थक करून घ्यावें.

**" महत् भाग्याचिया परवडी । वेंचुनियां पुण्यकोडी ॥**
**लाधली नरदेहाची जोडी । घडीनें घडी साधावी ॥** साईसच्चरित.
**शिर्डी क्षेत्राची वारी करा, । पाय बाबांचे चित्तिं धरा ॥**
अहो **कृष्ण परब्रह्माचें रुपडें । तयासही गुरु करणें पडें ॥**
**सांदिपनीच्या गृहीं लांकडें । सोसुनी सांकडें वाहिलीं ॥**
**राम दशरथी देव अवतारी । पूर्ण ज्ञानी विश्वास तारी ॥**

**अखिल ऋषिगण मानस विहारी । चरण धरी वशिष्ठाचे ॥**
**इतर सारे देव मायिक । गुरुचि शाश्वत देव एक ॥**
**चरणीं ठेवतां विश्वास देख । रेखेवर मारी मेखतो ॥** साईसच्चरित.

असा सद्गुरूचा महिमा आहे.

जातां जातां जगाच्या बाजारांतल्या संतसद्गुरू होऊं पहाणाऱ्या लोकांसाठीं कांहीं गोष्टी लिहितो त्या त्यांनीं जरूर परिशिलन कराव्यात. सद्गुरू म्हणजे कोण ?

(१) गुरुपरंपरेच्या द्वारें जो प्रत्यक्ष अनुभवी झाला आहे तो.

(२) दुसऱ्यांचीं पातकें स्वतांवर घेण्याचें सामर्थ्य ज्याला असेल तो.

(३) सर्वांभूतिं अकृत्रिम प्रेम असून भक्तीचें खरें वर्म जाणणारा तो.

(४) **धोत्रें नेसुनी रेशिमकानीं । होती काय संत कोणी ।**
**करूं लागती हाडांचे मणी । रक्ताचें पाणी निजकष्टें ॥**

असा हाडांचे मणी व रक्ताचें पाणी करणारा असेल तो.

(५) **उपदेश देती आणि घेती । ऐसे गुरु शिष्य असंख्य जगतीं ।**
**परि उपदेशासवें अनुभूतिं । देती हातीं ते विरळा ॥**

गुरुमंत्र देतांना, कान फुंकतांना, स्वानुभवाची पेरणी करणारा तो.

(६) सत्‌शिष्य असेल, जीव सेवा, शिवसेवा इत्यादींचें महत्त्व जाणून वागत असेल तो.

(७) अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ असेल तो.

मायबाप क्षमा करा. मला वाटलें तें मी सद्‌सद्विवेक बुद्धीला जागृत ठेवून लिहिलें आहे. उपयोग झाला तर ती तुम्हां संतजनांची कृपा समजेन.

स्वामी विवेकानन्द म्हणतात–" प्रत्यक्ष अनुभवापर्यंत न पोंचलेल्या कोणी अर्धवट माणसानें गुरुत्व स्वीकारलें तर त्याचें पतन होण्याचा फार संभव आहे. या पतनाचे केव्हां नुसत्या देहावर, तर केव्हां मनावर अथवा बुद्धिवरही परिणाम घडून येतात. नुसत्या देह-दुःखावरच हे परिणाम संपले तर त्या मनुष्यानें स्वतांस मोठें भाग्यवान समजावें. शिष्याच्या ठिकाणीं योग्यता आणणें हें अर्धवट माणसाला शक्य नाहीं. पूर्णत्वाला पोंहोचलेले म्हणजेच अवतारी पुरुष हें सहज करूं शकतात.

आपल्या श्रीसच्चिदानंद साईप्रभूनी कुणाला शिष्य केल्याचें ऐकिवांत आहे काय ? तरी त्यांनी आपल्या पाठीमागें सागरासारखा विशाल भक्तसमुदाय ठेवलेला पहातों ना आपण ?

बाबांनीं कान फुंकले का कुणाचे ? पण कान धरून प्रत्यक्ष अनुभवाचा गुरुपदेश ओतला त्यांत त्यांनीं ? खरें ना हें ? असो.

सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, मन पूर्णपणें ताळ्यावर ठेवून विचार–विवेकानें स्वानुभवाचा आनंदमय मार्ग दाखविणारा मिळाल्यास त्याला गुरु म्हणून मान द्या. पण

आजकाल असा माणूस विरळ आणि म्हणूनच मी मागें सांगितल्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरी, श्रीतुकोबारायांची गाथा, श्रीसाईसच्चरित या ग्रंथांचा नुसता अभ्यास केलात तर तेंच तुम्हांला परमोच्च सुखाला नेऊन पोंचविणाऱ्या रस्त्याचें दर्शन घडवितील म्हणजेच एकविध भावानें, एकमनानें, अंतःकरणापासून श्रीहरि नामस्मरण श्री हरी चिंतन कसें करावें हें दाखवितील.

आणि इतकेंही कुणाला मान्य नसेल, आणि गुरूवांचून गति नाहीं अशी ठाम समजूत असेल, तर अशांनीं खुशाल गुरु करावा. मात्र डोळे मिटून नव्हे, तर डोळे उघडे ठेवून, अंधश्रद्धेनें नव्हे तर पूर्ण जाणीव घेऊन. काका शिष्य झाला म्हणून मीही झालें पाहिजे म्हणून नव्हे तर–कांहींही असो–मात्र, माझें अशांना हात जोडून सांगणें आहे कीं, त्यांनीं कोणताही माणूस गुरु म्हणून निवडण्यापूर्वी त्या गुरु म्हणून म्हणवून घेणाऱ्या माणसांत खालील गोष्टीं आहेत किंवा काय याची खात्री करावी. आणि नंतरच जें मनानें योग्य वाटेल तें करावें.

**त्या गोष्टी म्हणजेः—**

१. मनाची समता असणारा.
२. शांत वृत्ति बाळगणारा.
३. क्षमाशील दानत.
४. निरुपद्रवी आचार.
५. रसना विग्रह.
६. अहंकारविरहीत वाचा उपयोग.
७. चहाडी दोषारोपादिपासून अलिप्त.
८. दुसऱ्यांचीं व्यंगें उणेपणा न काढणारा.
९. योग्य मार्गदर्शन करणारा.
१०. कोणत्याही व्यसनापासून अलिप्त.
११. प्रसिद्धि वगैरेच्या मोहापासून अलिप्त.
१२. स्वार्थबुद्धिहीनता.
१३. परोपकारी वृत्ति.
१४. प्राणी सेवा तत्परता.
१५. दांभिकपणा विरहीत आचार, विचार व उच्चार.
१६. अहंता, मी विरहीत.
१७. अन्यापारेषु व्यापार न करणारा.
१८. योग्य पारख असणारा.
१९. अनृत भाषा, असत्य बोल न वदणारा.

शिवाय गुरु ओळखण्याच्या मार्गदर्शनाबद्दल श्रीसाईलिलेच्या १९५१ च्या १ त्याच अंकांत पृष्ठ २२ तें २४ वर श्रीगुरूलिला अ० २२ सांतील कांहीं ओव्या

( ६२ तें ७४ ) चा उतारा मी दिला आहे; तो निःसंशय उपयोगी पडेल. त्या ओव्यांचें योग्य परिशिलन करूनच नंतर श्रीसद्गुरू निवडावा ही आग्रहाची विनंती आहे.

अशा पद्धतिनें एकदां गुरु दिक्षा घेतल्यानंतर मग मात्र गुरूवर पूर्ण निष्टा पूर्ण विश्वास व पूर्ण श्रद्धा ठेवून त्याच्या मार्गदर्शनावर हुकुम आपलें आचरण, वर्तन व दैनंदिन कार्यक्रम असले पाहिजेत. आणि मग—

**गुरू चरणीं ठेवतां भाव । आपोआप भेटे देव ॥**

नुसत्या एवढ्या भांडवलावर तुम्हीं परमेश्वराला आपलासा करूं शकता कारण परमेश्वर तरी काय पहातो " परि पाहे बीज शुद्ध अंगी " असें आहे हें म्हणून मायबाप उण्या अधिकाची सदय अंतःकरणानें मला क्षमा करून मी सुचविलेल्या मार्गानें श्रीविठ्ठलाची, श्रीसाईरायाची चरण युगुलें धरा त्यांचे स्मरण करा हें आपणांकडे माझें मागणें आहे.

**वेडी वांकुडी उत्तरें । बोलीली लेकरें ॥**
**क्षमा करा अपराध । महाराज तुम्हीं सिद्ध ॥**
**नाहीं उच्चारिला । अधिकार म्यां आपुला ॥**
**तुका म्हणे करा । राखा पायांपे किंकरा ॥**
**ज्ञानेश्वर माऊली । गुरुज्ञानराज माऊली । तुकाराम**
**ज्ञानेश्वर माऊली । गुरुज्ञानराज माऊली । तुकाराम**
**ज्ञानेश्वर माऊली । गुरुज्ञानराज माऊली । तुकाराम**

पुंडलिकवरदा हरी विठ्ठल । श्रीगुरू ज्ञानदेव तुकाराम । श्री पंढरीनाथ महाराजकी जय । श्रीशंकर महाराजकी जय । राजाधिराज सच्चिदानंद श्रीसद्गुरू साईनाथ महाराजकी जय ।

**मंगलमूर्ति मोरया**

**बाबांचा वाघ्या**
**१७-३-१९५२**

---

# भूपाळ्या

उठा देवा साईनाथा पहांट हो झाली । देवा पहांट हो झाली ॥
निद्रेची वेळ संपली दाटीं दारीं हो आली ॥ १ ॥
पंचप्राण काकडा करूनी भक्त हे आले । देवा० ॥
झोंप उडूं द्यावी त्वरीत दर्शन द्या भलें ॥ २ ॥
पंच उषःकाल समयीं नामाचा महिमा । देवा० ॥
गायिला पुराणी व्यासांनी तो येऊं दे कामा ॥ ३ ॥
दहीं, दूध लोणी घेऊनी भक्तगण आला । देवा० ॥
चिन्मयानंद भोग भोगण्या उशीर कीं झाला । ४ ॥

आशा तृष्णा कल्पना सांडुनी शून्याकार झालें । देवा० ॥
द्वैताचें जूं सारुनी तव चरणीं हो आले ॥ ५ ॥
दया क्षमा शांति दासी उभ्या सेवेला । देवा० ॥
केशव प्रार्थी कां ' साई ' घेशी मौनेला ॥ ६ ॥

२

उठा देवा साईनाथा अरुणोदय झाला ।
सरली निद्रावेळ आतां दर्शन द्या सकलां ॥ १ ॥
भाऊ, अण्णा, तात्या, बाळा झाले ती गोळा ।
सोडा सोडा शेज आतां दावा मुखकमला ॥ २ ॥
समाधीद्वारीं रंगमहाली झालीसे दाटी ।
मन उतावळें झालें करण्या गुजगोष्टी ॥ ३ ॥
पंचप्राण घेऊनीं ताटीं आलों तव पायां ।
उशीर कां करशी आतां केशवाछाया ॥ ४ ॥

३

उठी बा साईराया करा करा घाई ।
दोन हात तिसरे मस्तक ठेवूं दे पायीं ॥
भक्तिभाव नाहीं मज, धरिले पायाला ।
वेडा, खुळा, भोळा म्हणूनि ठाव दे मजला ॥
नवी गोधडी शिवून आले रे भक्त ।
नको अव्हेरुं मजला देईन कीं रक्त ॥
साईदेवा विठूराया कवणा मी पाहूं ।
चरणाधारें तुझ्या सर्व केशव मी साहूं ॥

—★—

# खरें सुख !

ज्या सुखासी नाहीं अंत । तें सुख आहे हृदयांत ॥
सुखदुःखाची रे मेळणी । करुनी वेई आपूलें मनीं ॥ ( एकनाथ ).

अहाहा ! किती गोड अभंग आहे हा ! अभंग फार मोठा आहे पण सध्यां दोनच ओळींचा विचार करुंया. वरील चरण दिसायला साधा दिसत आहे पण त्याचा अर्थ जर बारकाईनें पाहूं लागलों तर सबंध जीवनाचें कोडें सुटेल. पहिल्या ओळीचा विचार करतांना प्रथम सुख म्हणजे काय, अंत म्हणजे काय व हृदय म्हणजे काय तें पाहून शेवटीं अविनाशी असें सुख हृदयात कसें असतें तें पाहूंया.

श्रीसंतमाऊली एकनाथ यांचा हा अभंग कानावर पडल्यानंतर असें वाटतें कीं, ज्यावेळीं हा अभंग मुखांतून स्फुरण पावला असेल त्यावेळीं त्यांचें हृदय सुखप्रातीच्या अतूल आनंदानें भरून गेलें असावें. त्यांच्या हृदयसागरावर सुखलहरींना नुसती भरती आली असेल व जणू काय सागरामध्येंच नृत्य करण्याचें समाधान न पावून त्या लहरींचे तुषार त्यांच्या मुखावाटे बाहेर पडून किनाऱ्यावर बसलेल्या लोकांना न्हाऊं घालीत असावेत. संतांचा कोणताही अभंग घ्या. त्याची गोडी सदैव अविटच रहाणार.

संतवाङ्मयाचा अभ्यास फारच थोडे लोक करीत असतील. त्यालाही कारण आहे म्हणा. सध्यां साहित्य प्रांतांत नवीन व जुन्या मासिकांची, पाक्षिकांची व दैनिकांची एवढी गर्दी उडाली आहे कीं, संतवाङ्मयाकडे लक्ष देण्यास आम्हांस फुरसत आहे कोठें ! नवोदीत लेखक आणि कवि क्षितिजावर चमकूं लागले आहेत; त्यांच्या कविता पचनीं पाडतांना संतांचे अभंग—जुने झालेले ते—कोण वाचणार ? काल झपाट्यानें बदलत आहे व त्याप्रमाणें साहित्यांतही बदल होत आहे. परंतु हा साहित्यांत होत असलेला बदल सध्यांच्या समाजाला पोषक नाहीं. धर्माचा ऱ्हास होत आहे, व अशा वेळीं कालाच्या विराट चक्रामध्यें भ्रमिष्ठासारखें भ्रमण करणाऱ्या मानवास मार्गावर आणण्यास संतवाङ्मयाचीच जरूरी आहे. परमेश्वरावरची लोकांची श्रद्धा कमी झालेली आहे. कवींनासुद्धां काव्य करतांना क्वचितच् परमेश्वराची आठवण होते.

आधुनिक कवि व संतकवि यांमध्यें एक फरक आहे. नवकवि काव्य करूं लागला म्हणजे प्रथम त्याचा काव्याचा विषय ‘ स्त्री ’ हा असतो. पुढें पुढें तो निसर्गावर काव्य करतो. निसर्गामध्यें आढळणारी सुंदरता शब्दालंकारांनीं नटवून उपमांचे दागदागिनें घालून, काव्याचा भरजरी शालू नेसवून आपणापुढें प्रकट करतो. एक कवि काव्य करतो ‘ तुझ्या पाठीवर रुळणाऱ्या शेपट्यास ’ तर दुसरा लिहितो, ‘ तुझ्या वेणींतून पडलेल्या फुलास ’ यापलिकडे गेल्यानंतर कवि समोर दिसणाऱ्या दृश्य वस्तूंवर काव्य करतो मग ती वस्तू लेखणी असो, पायांतील जोडा असो वा खुंटीवर टांगलेला कोट असो. याच्याही पुढची पायरी म्हणजे कविकल्पनेचीं मनोराज्यें करीत विविध कल्पना काव्यांत प्रकट करतो. पण हें सर्व करतांना या सर्व वस्तूंचा जनक जो परमात्मा, त्याची त्याला आठवण फारच थोड्या वेळीं होते. हल्लीं काव्य करण्यास कवींना स्फूर्ति यावी लागते. कांहींना कॅप्स्टनचे झुरके मारून स्फूर्ति येते तर कांहींना ‘ एक सिंगल ’ घ्यावा लागतो तर कांहींना स्फूर्ति येण्याकरतां तासन्तास आकाशाकडे दृष्टी लावून बसावें लागतें. एवढें करून स्फूर्तिदेवतेनें आपला प्रवेश कवीच्या हृदयांत केल्यावर कवि एक सुंदरसें काव्य निर्माण करतो. याच्या उलट संतकवींना स्फूर्तिदेवतेची आराधना करण्याची जरुरी कधीं भासली नाहीं कारण स्फूर्तिदेवतेचा अखंड झरा त्यांच्या हृदयांतून वहात होता. संतांनीं काव्य केलें कीं, त्याचा शेवट ते परमात्म्याशीं संबंध जोडल्याशिवाय रहाणार नाहींत.

कल्पना करा कीं, एक नवकवि व एक संतकवि असे दोघेजण रस्त्यानें फिरायला निघाले आहेत. समोरून एक तरुणी चाललेली आहे. चालता चालता तिच्या केसांतून

एक गुलाबाचें फूल गळून पडलें आहे. तिला त्याची दाद नाहीं. इतक्यांत एक लहान बालक धांवत येऊन रस्ता ओलांडून पुढें गेला व त्याच्या पायांखालीं तें फूल तुडवलें गेलें. दोघांही कवींनीं हा प्रकार पाहिला व दोघेही हळहळले आणि दोघांनींही त्या प्रसंगावर काव्य केलें. आधुनिक कवि काय करील ? तो प्रथम त्या तरुणीचें व फुलाचें वर्णन करील व शेवटीं 'एवढें सुंदर फूल तुझ्या केसांतून पडण्यापेक्षां माझें हृदय कां विदीर्ण झालें नाहीं म्हणून शोक करील किंवा ते फूल स्वतःला उचलून घेतां आलें नाहीं म्हणून दुःख मानील पण संतकवि प्रथम दोघांचेंही वर्णन करील व शेवटीं लिहील कीं, "पहा परमेश्वराची लीला किती अगाध आहे ! एक वस्तू एका क्षणांत सुखांत अत्युच्च शिखरावर असते तर दुसऱ्याच क्षणीं दुःखाच्या खोल दरींत जाऊन पडते. परमेश्वरा, तुझ्या घरचा न्याय सर्वांना सारखाच ! तुझ्या पदरीं श्रीमान् व गरीब, सुंदर व कुरूप, हा भेदभाव नाहीं. एवढें सुंदर फूल, त्याचें सार्थक तरुणीच्या केसांत विराजमान झाल्यानेंच व्हावचें, पण एका क्षणीं त्या तरुणीच्या केशकलापांत डौलानें डोलणाऱ्या त्या पुष्पास दुसऱ्याच क्षणीं तूं खालीं पाडून एका बालकाच्या पायांखालीं तुडविलेंस ! काय ही तुझी योजना ! दुनियेमध्यें आज असेंच चाललें आहे व त्या दुनियेचा नियंता, तूं, हा सर्व खेळ मुकाट्यानें पहात आहेस. तुझें स्वरूप मला कधींतरी आकलन होईल का ? असें लिहून संतकवि त्याचा शेवट परमेश्वराजवळ नेऊन पोंचवील. संतकवींनीं कोणत्याही विषयावर काव्य केलें तरी त्या विषयाचा जनक परमेश्वर, त्याला ते विसरणार नाहींत हाच नवकवि व संतकवि यांमधला फरक.

आधुनिक काव्यामध्यें कांहीं काव्यें अशीं असतात कीं, ठराविक वेळीं ऐकल्यानेंच मनाला आल्हाद होता. तेंच काव्य एकसारखें ऐकून मन प्रसन्न होत नाहीं. परंतु संतांचा कोणताही अभंग घ्या, केव्हांही ऐका, तुम्हीं कंटाळणार नाहीं. '**मागणें लई नाहीं, लई नाहीं पोटापुरतें देई देवा** ॥ हा तुकारामाचा अभंग लहान बालकापासून तों वार्धक्यावस्थेला पोंचलेल्या पंतोजींना सारखाच गोड वाटेल. 'लई नाहीं' हा शब्दप्रयोग इतर वेळीं कानाला कांहींतरी वाटेल पण या अभंगामध्यें त्याऐवजीं दुसरा कोणताही शब्द अलंकाराचा साज चढवून वापरला असता तर गोड वाटला नसता. कारण कवीला जेव्हां हा अभंग स्फुरला तेव्हां वरील शब्द त्याच्या हृदयांतून मुखावाटे बाहेर फेंकले गेले. हृदयामध्यें सतत स्रवणाऱ्या सुखाच्या धारेंतून ते तुषार बाहेर पडले म्हणून त्याची गोडी अवीट आहे. सुखामधून उत्पन्न झालेली गोष्ट सुखदायी असणार. खरें सुख कोणतें व कोठें आहे तें संतांना माहीत आहे म्हणूनच संत म्हणतात.

**ज्या सुखासी नाहीं अंत । तें सुख आहे हृदयांत** ॥ सुखाविषयींच्या आमच्या कल्पना अजून मागासलेल्या आहेत. सुख म्हणजे काय व तें कशापासून लाभतें तें आम्हांस समजत नाहीं. असा प्रश्न मनाला विचारावासा वाटतो कीं, सुख आणि दुःख या गोष्टी खरोखरच अस्तित्वांत आहेत का ? जगामध्यें पाहूं गेलें तर जिकडे तिकडे दुःखाचा वणवा पेटलेला आढळेल; पण सुखाची पाणपोई दिसणार नाहीं. मग

सुख म्हणजे काय चीज आहे. ज्याच्याजवळ पैसा नाहीं तो म्हणतो मला पैसा मिळाला कीं मी सुखी होईन, ज्याला मूलबाळ नाहीं तो म्हणेल मला मुलगा झाला कीं मी सुखी होईन. तरुण तरुणींना वाटतें कीं आपलं प्रेम सफल झालें कीं आपण सुखी होऊं; तात्पर्य काय कीं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं हवें असतें व ती इच्छित वस्तू प्राप्त झाली कीं सुख लाभलें असें प्रत्येकाला वाटतें; परंतु इच्छित वस्तू प्राप्त होऊनही मनुष्य सुखी होतो का? नाहीं. कारण ती वस्तू विनाशी असते. ती जोंपर्यंत आहे तोंपर्यंत सुख लाभेल. तिच्या पश्चात् सुख जाईल. बरें ती वस्तूसुद्धां, मेल्यानंतर मनुष्य बरोबर नेऊं शकत नाहीं. तिचा वियोग होतोच. आणि हें जें सुख, ती वस्तू प्राप्त झाल्यानंतर मिळतें तें विनाशी सुख होय. असें विनाशी सुख प्रत्येकाच्या वांटणीला थोड्याबहूत प्रमाणांत येतेंच, मग तरीसुद्धां सुखासाठीं आम्हीं कां धडपडतों? हें जें विनाशी सुख आमच्या वांट्याला येतें त्यांत समाधान न मानून आम्हीं सुखासाठीं धडपडतों याचें कारण आम्हांला खरें सुख जें नाशिवंत नाहीं असें अविनाशी सुख पाहिजे असतें.

आंतून हृदयाची ओरड चालू असते कीं, सुख पाहिजे पण मनाला वाटतें कीं हें सुख इच्छित वस्तू प्राप्त झाल्यानें होईल. म्हणूनच इच्छापूर्ति झाल्यावर मनाचें समाधान होतें पण हृदयाला सुख मिळत नाहीं. आमचें मन मात्र कांहीं काल त्या विनाशी सुखांत गुरफटून राहतें. कांहीं कालानंतर त्याला पुनः हृदयाची हांक ऐकूं येते; 'अरे सुख पाहिजे, शोधून आण!' मग पुन्हां मनाला वाटतें कीं, आतां दुसरी वस्तू मिळविली पाहिजे—बंगला बांधला आतां मोटार घेतली पाहिजे—म्हणजे सुख मिळेल. अर्थात् मनुष्य मग दुसरी वस्तू प्राप्त करून घेण्याच्या मागें लागतो. ती प्राप्त झाल्यावर कांहीं काल मनाला सुख मिळतें पण पुन्हां हृदयाची हांक ऐकूं येते व मनाचें समाधान नष्ट पावतें. याप्रमाणें मनुष्याचें मन हें एका वस्तू मागून दुसऱ्या वस्तू मागें सारखें भटकत असतें. सुख ही चीज जणूं काय पृथ्वीमध्यें कोठेंतरी दडविलेली आहे. या समजुतीनें मनुष्य ती हस्तगत करण्यासाठीं निरनिराळे बेत करतो व शेवटीं फसतो. इच्छीत वस्तू प्राप्त झाल्यानंतर सुख मिळेल या कल्पनेमागें धांवत राहिल्यानें त्याला त्याच्या जीवनक्रमांत विनाशी सुखाचे घुटके प्राशन करावयास मिळतात पण त्यांनीं सुखी न होऊन तो नकळत अविनाशी सुख प्राप्त करून घेण्यास जीवनाच्या अंतापर्यंत धडपडतो व शेवटीं अतृप्त राहतो. अर्थात् खरें सुख त्याला कधींच मिळत नाहीं. जर खऱ्या सुखाची प्राप्ती त्याला झाली असती तर तो शेवटपर्यंत सुखामागें कधींच धडपडला नसता. तो तसा धांवतो याला कारण खरें सुख कोणतें हें त्याला कळत नाहीं. म्हणूनच समर्थांनीं म्हटलें आहे.

**'जगीं सर्व सुखी असा कोण आहे।**
**विचारी मना तूंच शोधून पाहे॥'**

समर्थ मनाला उपदेश करतात कीं, हे मना तूं सुखासाठीं धडपडत आहेस. क्षणैक सुखांत रममाण होतोस तर प्रतिक्षणीं दुःखांत डुंबतोस त्या तुला सुख

म्हणजे काय तें माहीत आहे का? जगांत कोण सुखी आहे? सर्वजण विनाशी सुखाच्या मागें लागले आहेत. अविनाशी असें खरें सुख कोणाला मिळालें नाहीं म्हणून हे मना, तूंच विचार कर व शोधून पहा. तुला सुख कोणतें तें कळलें नाहीं. तुझें हृदय ज्या सुखामागें आहे तें सुख अविनाशी आहे; तें शोधून काढ. तूं ज्याच्यामागें आहेस तें सुख हृदयाला नको आहे. दुसऱ्याचें क्षणैक सुख पाहून तूं दुःखी होतोस. शेजाऱ्यानें गाडी घेतली अगर घर बांधलें तर तो सुखी समजून तूं दुःखी होऊं नकोस. आपल्यापेक्षां आपला शेजारी जास्त सुखी असें तुला वाटतें पण ती तुझी चूक होय. आपला मित्र रुबाबदार राहूं लागला, आपली तेवढी ऐपत नसेल तर तो आपल्यापेक्षां जास्त सुखी असें समजूं नकोस; कारण तो जें सुख भोगत आहे तें विनाशी आहे. त्याच्या पूर्वसंचिताप्रमाणें तो तें भोगत आहे. आणि त्याचें या जन्मीचें कर्म त्याच्या पुढील जन्माची तयारी करून ठेवीत आहे. खरें सुख त्याला मिळालेलें नाहीं. उलट तूंच त्याच्यापेक्षां भाग्यवान आहेस, कारण विनाशी सुखांत मग्न झाल्यामुळें खरें सुख शोधण्याचा जो प्रयत्न करीत नाहीं व हृदयांतला आनंद भोगण्याच्या अमूल्य संधीला तो मुकतो पण तुला त्याच्यापेक्षां कमी विनाशी सुख मिळत आहे. म्हणून तूं जास्त सुखाच्या मागें न लागतां अविनाशी सुख शोधण्याचा प्रयत्न कर. पृथ्वीवर जीवन कंठणारा प्रत्येक मानवप्राणी दर्जानें सारखाच. पैशानें, श्रीमंतीनें उच्चपणाची मोजणी करतां येणार नाहीं, कारण पैसा नाशवंत आहे. हे मना, पैशानें सुख मिळतें हा तुझा भ्रम आहे. नीट विचार करून हा भ्रम सोडून दे व त्या दृष्टीनें जगांत कोण सुखी आहे तें शोधून पहा. तुला एकदां अविनाशी सुख प्राप्त झालें कीं लक्ष्मी तुझी दासी होऊन राहील. लक्ष्मीच्या मागें न लागतां खरें सुख कोठें आहे तें शोधून काढ कीं तुझ्या पायांशीं हात जोडून लक्ष्मी सदैव उभी राहील. महात्मा गांधींचें उदाहरण घे. त्या महात्म्यानें संपत्तीवर लाथ मारली व अविनाशी सुखाची प्राप्ती करून तो देवाघरचा मेवा इतरे जनांना वांटण्याकरतां तो जन्मभर फिरला. अंगावर धोतर व पंचा या वेषांत त्यानें जगाची सफर केली पण जगाच्या ज्या ज्या कोपऱ्यांत ईश्वरानें मानवाला दिलेला सुखाचा ठेवा लोकांना देण्याकरितां तो गेला, त्या प्रत्येक ठिकाणीं लक्ष्मी त्याच्या पायांवर लोळण घेत होती. विनाशीं सुखाची पर्वा न करतां अविनाशी सुख शोधण्यास जो निघाला, जनतेनें त्याची उपेक्षा केली, पण एकदां त्याला सुखाचा ठेवा सांपडल्यानंतर त्या सुखाचें, हृदयांतील प्रकट झालेल्या अतूल स्वानंदाचें दैदिप्यमान तेज त्याच्या चेहऱ्यावर झळकूं लागलें व सारें जगत् त्याच्या चरणीं नम्र झालें. खरें सुख प्राप्त झाल्यावर तो महात्मा झाला. तो खरा सुखी! हे मना, असा सुखी जगांत कोणी आहे का पहा. हे मना, तूं विचारी आहेस, सुखाचा शोध कर असा आदेश समर्थांनीं दिला आहे.

खरें सुख म्हणजे हृदयांमध्यें वाहणारा आत्मानंदाचा झरा. सुख म्हणजे समाधान! मनाला होणारें समाधान कायम नसतें म्हणून तें खरें सुख नाहीं. ज्यायोगें हृदय समाधान पावेल व आनंदानें डोलूं लागेल तें खरें सुख. हेंच सुख प्रत्येकाला हवें असतें.

सुख म्हणजे काय याचा विचार केल्यानंवर ' **अंत** ' या शब्दाचा विचार करूंया. अंत आणि अनंत. अंत म्हणजे शेवट व अनंत म्हणजे ज्याला शेवट नाहीं असें. ज्याला शेवट नाहीं असें काय आहे ? कांहींच नाहीं. ज्याला सुरवात आहे त्याला शेवट आहेच; हा सिद्धांत आहे. मग ज्याला सुरवातही नाहीं व शेवटही नाहीं असें काय ? परमेश्वर. ज्याला आदि नाहीं, अंत नाहीं असा तो अनादि अनंत सर्वसाक्षीभूत परमेश्वर, ज्याच्यापासून विश्वाची उत्पत्ती झाली व ज्यामध्यें शेवटीं तें विलीन होणार असा तो मुरलीधर शामसुंदर ! तोच सुख-निधान आहे. बाकी सर्व गोष्टी, ज्यांना अंत आहे, त्या दृश्य आहेत.

खरें सुख कसें आहे ? अविनाशी म्हणजेच अनंत आहे. या अनंत सुखाचा उगम अनंत अशा परमात्म्यामध्येंच होतो. आपल्या इंद्रियांनीं जें सुख आपण भोगतों तें सुख विनाशी होय; पण खरें अविनाशी सुख इंद्रियांना प्राप्त होणारें नाहीं. कारण तें सुख अनंत आहे. व इंद्रियें अनंत नाहींत अर्थात् ज्या वस्तूला अंत आहे ती वस्तू अनंताचा उपभोग घेऊं शकणार नाहीं. अनंताचा आनंद उपभोगण्यास अनंत असा परमात्माच पाहिजे. म्हणून अंत या शब्दाला फार महत्त्व आहे. संत म्हणतात, सुख कोणतें तर ज्याला अंत नाहीं असें व तें आहे कोठें तर हृदयांत.

आतां हृदय या शब्दाचा विचार करूंया. हृदय म्हणजे परमेश्वराचें वसतिस्थान. हृदयाचा विचार करतांना मनाचाहि परामर्श घेणें आवश्यक आहे. कारण हृदय व मन हीं दोन भिन्न अंगें आहेत. तरी कांहींजण तीं एकच म्हणून समजतात.

**हृदयसिंहासनीं बैसली स्वारी ।**
**करुनि घेई बुद्धीची चाकरी ॥**
**देऊनी मना हातीं लगाम दोरी ।**
**चालवी जीवनरथा भूवरी ॥**

हृदयाच्या सिंहासनावर परमात्मा विजयमान झाला आहे व बुद्धीच्या मार्फत तो मनाला हुकूम सोडीत आहे; आणि आयुष्याचा रथ पुढें चालवित आहे. हृदय म्हटलें म्हणजे शरीराच्या आंत मनाच्या मागें खोल कांहीं तरी आहे असें वाटतें. एखादी इच्छा मनापासून होणें निराळें व हृदयांतून होणें निराळें, पुष्कळजण देवाची आराधना करतात पण त्यांचें एकचित्त होत नाहीं. देवाचें ध्यान करूं लागलों तर मन भटक्या मारतें. Concentration होत नाहीं, असें पुष्कळजण म्हणतात. अरे पण, मनाची एकाग्रता कसली घेऊन बसलांत ? तुमचें मन एकाग्र कधींच होणार नाहीं. देवाला आळवितां ते मनांतून नका आळवूं, हृदयांतून आळवा. एक मिनीट विचार करा कीं आपल्या मनाच्या मागें हृदय आहे व परमेश्वर तेथें वास करीत आहे; आणि मग त्या परमेश्वराला पहाण्याकरितां मनाला झुगारून द्या, विसरून जा, आणि डोळे बंद करून हृदयाकडे दृष्टी लावा. जेथून हृदयाचें स्पंदन चालतें तेथें कान लावा व मनाला अजिबात विसरून हृदयाच्या ठोक्यांतून कोणता नाद उत्पन्न होतो तो ऐका. हृदयामध्यें दृष्टी स्थिर झाली कीं तुम्ही

एकाग्र झालांत, परमेश्वराच्या समीप गेलांत. मन व हृदय यांमधील फरक लक्षांत आणून प्रत्येक गोष्टीचा विचार करतांना हृदयांत शिरा कीं तुम्हांस हवें तें सांपडेल.

हृदय व मन यांचा विचार केल्यानंतर, 'ज्या सुखासी नाहीं अंत, तें सुख आहे हृदयांत' कसें आहे तें पाहूंया. हृदयांत काय आहे ? हृदयांत अनंत असा परमात्मा आहे. अनंत अशा परमात्म्याजवळच अनंत असें सुख असणार, आणि परमात्मा हाच सुखनिधान असल्यामुळें अनंत असें सुख हृदयांतच आहे. म्हणून संत म्हणतात, 'ज्या सुखासी नाहीं अंत, तें सुख आहे हृदयांत !'

जन्माला आल्यापासून तों मृत्यूपर्यंत प्रत्येक प्राणिमात्र सुखासाठीं धडपडतो म्हणजे काय ? लहान मूल जन्माला येतांच त्याच्या हृदयांत सुखाचा ठेवा असतो. हृदयस्थ असलेल्या परमात्म्याजवळ सुखाचें भांडार असतें. पण जसजसें तें बालक मोठें होतें तसतसें तें मायेच्या पसाऱ्यांत गुरफटतें व स्वतःच्या हृदयांत असलेला सुखाचा ठेवा त्यांस सांपडत नाहीं. मायेच्या मागें लागून मनुष्य विनाशी सुख भोगण्याचा प्रयत्न करतो व आपल्या कल्पनेनें सुख आणि दुःख निर्माण करतो. हे सर्व मनाचे खेळ होतात. कारण मन मायेच्या आधीन असतें. परंतु हृदयाला हा खेळ पाहावत नाहीं. आंत स्वतः जवळ असलेला निर्मल आनंदाचा ठेवा लाथाडून मनुष्य भलत्याच गोष्टींच्या मागें लागला कीं हृदय चित्कारून उठतें पण हृदयाची भाषा मनाला कळत नाहीं आणि हृदय व मन यांमधला सूक्ष्म भेद माहीत नसल्यामुळें मनुष्यप्राणी मनाचें समाधान करूं पाहतो. हृदयाची हांक तशीच रहाते. मनुष्याच्या हृदयांत जर सुखाचा ठेवा नसता तर तो सुखाच्या मागें कधींच लागला नसता. पण हा अनंत सुखाचा ठेवा त्याला चैन पडूं देत नाहीं व त्याचें आकलन न झाल्यामुळें विनाशी सुखाच्या मागें लागून मनुष्य दुःखी होतो.

म्हणून संतांनीं पुढें म्हटलें आहे कीं—

सुखदुःखाची रे मेळणी । करुनी घेई आपुले मनीं ॥

संत म्हणतात, अरे, खरें सुख तुला कळलें, तें कोठें आहे तें समजलें तर तूं क्षणांत सुखी व क्षणांत दुःखी कां होतोस. तूं जें स्वतःच्या कल्पनेनें सुख आणि दुःख निर्माण करतोस तें खरें नाहीं. एखादी गोष्ट तुझ्या इच्छेविरुद्ध घडली व तुला दुःख झालें किंवा एखादी इच्छित वस्तू प्राप्त होऊन तुला सुख झालें तरी त्यांत मग्न होऊं नकोस. कारण ते सर्व मनाचे खेळ आहेत. त्यांची मिळवणी तूं आपल्या मनामध्यें करून घे, आणि खरें सुख हृदयांत आहे त्याचा शोध कर.

संताच्या या उपदेशाप्रमाणें जर आपण वागलों तर पृथ्वीच्या पाठीवर एकही प्राणी दुःखी रहाणार नाहीं. पहा, वरील अभंगाच्या दोनच ओळी. परंतु त्यामध्यें सर्व जीवनांचें कोडें सांठविलेलें आहे. तें सुटलें कीं मनुष्य सुखी झालाच.

**प्रमोद गव्हाणकर**

---

# श्रीसाई–प्रभाव

श्रीसंतचूडामणि श्री सद्गुरु साईमाऊली, दीनांची साउली व प्रेमाची पान्हुली समाधीस्त झाल्यानंतर सुद्धां भक्तांना प्रत्यक्ष भेट देऊन, त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकून तळहातावर त्यांना झेलून रक्षण करीत आहे. अनन्याश्रित यंतो मां ॥ ( भ. गीता. अ. ९ ) ह्या श्लोकाचा खरोखर दृश्य सृष्टींत अनुभव घ्यावयाचा असेल तर, " निश्चयाचें बळ । तुका म्हणें तेंचि फळ ॥ निश्चय, श्रद्धा व सबुरी बाळगा व अनन्य शरण जा." " मामेकं शरणं व्रज:" आणि पहा चमत्कार.

## ( १ )

सन १९५१ सालीं रामनवमीच्या दिवशीं, श्रीयुत पुंडलिक भगवान कांदळगांवकर, एक म्यु० नोकर, रामनवमीच्या उत्सवाकरितां कुर्ला मुक्कामीं आला. त्यांनीं मला सांगितलें, " अण्णासाहेब, बाबा आम्हांला दिसत नाहींत म्हणावें तर दिसतात पण आमची दृष्टी पापी असल्यामुळें त्यांना ओळखतां येत नाहीं.

" तें कसें रे ? " मी विचारलें.

त्यांनीं उत्तर दिलें, ' मी उत्तम गणपती करतों व कांदेवाडींत आज बरेंच वर्षें गणपतीची शाळा मोसममध्यें सुरू करतों. ह्या वर्षीं माझी पहिली जागा गेली व दुसरी जागा मिळेना, मला वाईट वाटलें व काळजींत दोन दिवस घालविले. आपणाकडे रामजन्म होतो हें माहीत असल्यामुळें मी आपणाकडे संध्याकाळीं सुमारें ७ वाजण्याच्या सुमारास आलों तोंच एक फकीर, ' मी उपाशीं आहे, मला २ पैसे दे.' मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलें व पुढें सटकलों पण तो माझ्या पाठीमागें आला. शेवटीं मला त्याला दोन पैसे देणें भाग पडलें. मी त्याला दोन पैसे दिल्याबरोबर तो म्हणाला, ' अल्ला तेरा भला करेगा. जाव आपका जुना मकान मिलेंगा.' मी आपणाकडून निघालों तो घरीं आलों व दुसरें दिवशीं सहज कांदेवाडींत गेलों तर मला माझा पूर्वीचा मालक भेटला व त्यानें मला आपली जागा दिली व माझें काम झालें.'

## ( २ )

एकदां गुरुपौर्णिमेच्या दिवशीं मी पूजा केली, आरती झाली नैवेद्य वगैरे झालें पण चिलीम व विडी देण्यास विसरलों कारण नेहमींच्या पूजेंत ते देत नाहीं. फक्त उत्सवांत–रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी ह्या दिवशीं मात्र सर्व सोहळे करतों. अर्थात् मला त्याचें अवधान राहिलें नाहीं, उत्सव संपला, कालाकीर्तन झालें व मी दुसरें दिवशीं सकाळीं दवाखान्यांत जाण्यास निघालों. दवाखान्यांतून १२–३० वाजतां निघून परत घरीं कुर्ल्यास आलों तर कुर्ल्याच्या स्टेशनबाहेर एक फकीर मला भेटला व म्हणाला, ' मला एक चिलीम पिलाव व एक पट्टी खिलाव ' मला ह्याचा अर्थ कळला नाहीं. मी त्याला दोन आणे दिले व पुढें सटकलों पण त्याचा विचार करूं लागलों तर मला कसें कळून आलें कीं, काल चिलीम व विडा बाबांना मिळाला नाहीं. अशा तऱ्हेचा प्रकार खुद्द बाबा असतांना घडला त्याची मला आठवण झाली. कै. काकासाहेब दीक्षित, बाबांचे परम भक्त एकदां

गुरुपौर्णिमेच्या दिवशीं आपल्या वाड्यांत (दीक्षित वाड्यांत) बाबांच्या छबीची पूजा केली. त्यांत एक व्यंग राहिलें तें त्यांच्या लक्षांत आले नाहीं. पूजा यथासांग झाली पण विडा देण्याचें राहिलें. नेहमीं विडा देण्याची त्यांची वहिवाट नसल्यानें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. तिसरे प्रहरीं बाबांनीं त्यांना बोलाविलें व २४ विडे करून आणावयास सांगितले. त्याप्रमाणें त्यांनीं ते करून नेले व बाबांनीं त्यांतील एक विडा न कुटतां खाल्ला. अशा तऱ्हेनें बाबांनीं आपली पूजा यथासांग करून घेतली.

( ३ )

यावरून बाबांचा एक जुना अनुभव आठवला व तो मुद्दाम छापावा असें वाटल्यावरून लिहीत आहे.

अंजनवेलचे मथुरादास, महाराजांचे दर्शनास वारंवार येत ते सगुण (मेरु नाईक) यांचे खाणावळींत उतरत. एकदां ते व सगुण बोलत बसले असतां कांहीं लोकांच्या उखाळ्या पाखाळ्या निघाल्या. त्यानंतर मथुरादास महाराजांच्या दर्शनास गेले. ते बसल्यानंतर लगेच बाबांनीं विचारलें, ‘ सगुण काय म्हणत होता ? अर्थात् मथुरादास लाजले व मनांत समजले कीं, सगुणकडे चाललें होतें व चालत आहे तें महाराजांस पसंत नाहीं. कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें किंवा त्या ऐकणें चांगलें नव्हे. हा धडा मथुरादासांनीं घेतला व बाबांची क्षमा मागितली.

( ४ )

एकदां एक कर्णिक नांवाचा इसम माझेकडे आला व म्हणाला, ‘ आमची परिस्थिति बरी नाहीं, मी काय करूं ? त्याला श्रीसाईबाबांची गाथा श्रीसाईचरित्र दिलें व हें वाचत जा. बाबा तुझें कल्याण करतील. त्याचा बाबांवर इतका विश्वास बसला. त्याचाच नव्हे तर त्याच्या वडिलांचा, मातोश्रीचा व घरांतील सर्व मंडळींचा विश्वास बसला. त्याला संकष्टी चतुर्थी करण्यास सांगितलें होतें व तो ती नियमानें करी. तो पोष्टांत नोकरीला आहे. घरची गरिबी, कोणतेंही व्यसन नाहीं. सालस, होतकरू २०।२४ वर्षांचा हा तरुण आपले पोष्टांतील काम व श्रीसाईबाबा या व्यतिरिक्त त्याला कांहीं माहीत नाहीं. एकदां एका संकष्टी चतुर्थीच्या दिवशीं हा ऑफिसांत गेल्यावर त्याचे घरीं दादरला (विजयनगर) एक म्हातारा इसम आला व पांढऱ्या दूर्वा त्याच्या आजीकडे देऊन म्हणाला, ‘ ह्या कर्णिकला द्या व त्याला म्हणावें ह्या देवावर घाला.’ इतकें सांगून तो निघून गेला. घरच्या मंडळीस वाटलें कीं, कोणीतरी त्याच्या ओळखीच्या इसमानें दिल्या असतील. कर्णिक संध्याकाळीं घरीं आला. त्याला त्या दुर्वा त्याच्या आईनें दिल्या व म्हणाली, “ कोण एक म्हातारे गृहस्थ ह्या घेऊन आले होते. ” त्याला वाटलें मी पाठविल्या असतील; म्हणून तो लगेच दवाखान्यांत आला. मला आश्चर्य वाटलें, मी म्हटलें, “ अरे त्या देवाची लीला अगाध आहे. तूं त्या श्रीगणेशावर वहा. व उद्यां तो प्रसाद म्हणून जवळ बाळग. तुझें लग्न लवकर होणार असें वाटतें. आणि खरोखरीनेंच २-३ महिन्यांनेंच त्याला श्रीमंतांची मुलगी मिळून त्याचें लग्न झालें व त्यांची स्थिती आतां बरी आहे.

श्रीसाईसत्‌चरित्राचे लेखक कै. अण्णासाहेब दाभोळकर ह्यांना बाबांनीं श्रीगणेश-रूपांतच त्यांचे घरीं वांद्यास दर्शन दिलें होतें व संकष्टी चतुर्थी करावी असें सांगितलें होतें. हें आतां पटतें. कारण त्यावेळेस बाबा प्रत्यक्ष देहरूपधारी शिर्डीत होते, तर आतां चैतन्यरूपानीं सर्वांभूतीं आहेत.

( ५ )

एकदां एक व्यंकटेश अय्यर नांवाचे गृहस्थ माझा तपास करीत आले आपण कोठून आलांत असें विचारल्यावर त्यांनीं ( इंग्रजींतच ) मद्रासकडील गुड्डूर येथील रहाणारा आहे असें सांगितलें. त्यांनीं सांगितलें कीं, एका गृहस्थाचे स्वप्नांत श्रीसाईबाबांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन तेथील विवक्षित जागीं आपलें देऊळ बांधण्यास सांगितलें. ती जागा लाकूड-तोडीचा धंदा करणाऱ्या मजूर वर्गाच्या रहाण्याची होती. व त्या लोकांना बाबांची माहिती नसल्यामुळें देवळाकरतां जागा देण्याचें त्यांनीं नाकारलें. पुढें ते लांकूडतोडे एक दिवस जंगलांतून परत येत असतां दिवसाढवळ्या एक फकीर भेटला व म्हणाला, मला रहाण्यास जागा द्या. पुढें तो फकीर म्हणजे श्रीसाईबाबा ही कल्पना त्या लोकांस नव्हती. परंतु कांहीं दिवसांनीं देऊळ बांधण्यास जागा मागणाऱ्या गृहस्थांची व त्या लोकांची पुन्हां भेट झाली. ते लोक साहाजिकच एक फकीर भेटून रहाण्यास जागा मागत होता वगैरे हकीगत सांगूं लागले. तेव्हां त्या गृहस्थानें आपल्याजवळ असलेला बाबांचा फोटो त्या लोकांस दाखविला. तेव्हां आश्चर्य असें कीं, त्या लोकांस भेटलेला फकीर तो हाच अशी पूर्ण ओळख पटून त्यांनीं जागा देण्याचें ताबडतोब कबूल केलें; व त्या जागीं बाबांचें लहानसें देऊळ बांधलें गेलें. देऊळ ता. १५ जून १९४० सालीं बांधलें व त्यांत श्रीसाईबाबांची छबी ठेविली आहे. तेथे नित्यनियमानें त्रिकाळ पूजा अर्चा वगैरे होतें. त्यांनीं आणखी बरेच अनुभव सांगितले.

[ ६ ]

रा. रा. दत्तात्रेय पु. कांदळगांवकर एक शाळामास्तर ( मराठी ) त्यांनीं सांगित-लेला व प्रत्यक्ष कांहीं सद्‌गृहस्थांनीं अनुभविलेला प्रसंग सांगितला. माझ्या अंगावर प्रेमा-मृताचे शहारे आले.

मास्तर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांचे कुटुंबाला जवळजवळ १० माणसें आहेत. अशा परिस्थितींत गांगरून न जातां ‘ माझी साईमाऊली माझी रोटी बंद नाहीं करणार ’ त्यांनीं आपल्या घरीं (दादर) श्रीसाईसत्‌चरित्राचा सप्ताह मांडला. त्यांचें बिऱ्हाड सध्यां वांद्रें मुक्कामीं आहे. त्यांची मोठी मुलगी रोज सकाळ संध्याकाळ वांद्याहून जेवण घेऊन येत असे, कारण सप्ताहांत ते कुठेंच जात नसत. सप्ताह संपला. सांत दिवस पुरे झाले, व आठवे दिवशीं फक्त अवतिर्णिका वाचणें शिल्लक राहिलें. त्या दिवशीं व्रताचें पारणें फेडण्याकरतां लागणाऱ्या सामानाची खरेदी करण्याकरतां संध्याकाळीं ६ च्या सुमारास दादरला बाजारांत गेले. त्यांची मोठी मुलगी संध्याकाळीं आली तर खोलीला कुलूप. थोडा वेळ वाट पाहून ती घरीं परत ( वांद्यास ) यावयास निघाली.

रात्र झाली होती. संध्याकाळ झाली कीं वांद्यासारखा ठिकाणीं रस्त्यावरची येजा बरीच कमी होते. अशावेळीं ती एकटीच रस्त्यानें येत होती; तोंच तिचे वडील तिला भेटले व म्हणाले, 'चल तुला मी पोंचविता' त्यांनीं तीला घराचे सीमेपर्यंत पोंचती केली व 'तूं आतां जा' असें म्हणून पाठिमागें फिरलें आपले वडील येतील म्हणून वाट पहात राहिली. दुसरे दिवशीं मंडळी दादरला गेल्यावर मास्तरांस विचारूं लागली कीं, 'काल घरापर्यंत येऊन वर घरांत कां नाहीं आलांत?' मास्तरांना आश्चर्य वाटलें व म्हणाले 'काल मी वांद्याला गेलोंच नाहीं. फक्त सामनें आणण्यासाठीं दादरला गेलों होतों. अर्थात् श्रीसाईबाबा मास्तरांचें रूप घेऊन आले व त्यांनीं मुलीस घरापर्यंत पोंचविलें. मास्तरांचा सप्ताहें पुरा झाला तोंच त्यांना लहानशी नोकरी मिळाली व त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय झाली.

**भक्ती ही बाभूळ वनींची वाट।**
**खांचखळगे अति बिकट।**
**एक पावली परी ती नीट।**
**हरी निकट नेई कीं॥**
**कांटा टाळूनि टाका पाय।**
**हाचि एक सुलभ उपाय।**
**तरींच निजधाम पावाल निर्भय।**
**निक्षूनि गुरुमाय वदे हें॥**

श्री. सद्गुरूच्या भक्तींचें फळ, सेवा कशा रीतीनें केली असतां मिळतें हें दर्शवित आहे. गीतेंत त्याचें वर्णन—

**राज्यविद्या राजगुह्यं पवित्र मिदमुत्तमम्।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम॥**

असें केलें आहे. राजमार्ग झाला तरी निर्बंध पाळणें आहेच. राजमार्गावरील निर्बंध तेंच बाभूळ वनांतील कांटे, निर्बंध पाळा किंवा कांटे टाळून पाऊल टाका, काय! अर्थ एकच.

देव भावाचा भुकेला. त्याला प्रेम पाहिजे.

संपादक.

# शिरडी—वार्ता

## जानेवारी १९५२.

या महिन्यांत श्रीसाईबाबांचे दर्शनास, बाहेरगांवचे बरेच भक्त लोक येऊन गेले.

**देणगी**—या महिन्यांत एकूण ४७ भक्तांकडून श्रीसाईसंस्थानकडे गलेफ, सोन्याचांदीचे व पितळेचे जिन्नस देणगीदाखल आले.

श्री. डी. पी. ठाणावाला, मुंबई यांनीं चांदीच्या दोन समई वजन २२६ तोळे व त्यांना दोन लाकडी केसीस किंमत सुमारें ८०० रुपये देणगी दिली.

श्री. विनायक अप्पाजी वैद्य, अंधेरी चांदीचे दोन बार. वजन ७२ तोळे.
श्री. पी. एन्. कपील, मुंबई, चांदीचा १ बार वजन ३६॥ तोळे.
श्री. एन्. एस्. कोवाडकर, बेळगांव, चांदीचा १ बार वजन ३६॥ तोळे.

**धर्मकृत्य**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे भक्तांचे विधी संस्थानकडून यथासांग केले गेले. भक्तांच्या श्रीसत्यनारायणाच्या आठ पूजा श्रीमंदिरांत झाल्या.

**कीर्तन**—संस्थान गवई यांची पौ० शु०॥ ११ व पौष व०॥ ११ अशीं दोन कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं.

**नवल विशेष**—खालील कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली.

| | |
|---|---|
| श्री. जगन्नाथ मोहिले, मुंबई ... ... ... ... | फ्ल्यूट वादन. |
| ,, अनिल मोहिले ,, ... ... ... ... | मेंटल वादन |
| श्री. पी. डी. बिडवे, पुणें ... ... ... ... | तबलावादन |
| ,, विमल चवाथे, मुंबई ... ... ... ... | गायन |
| ,, भागवत गवळी, मुंबई ... ... ... ... | ,, |
| ,, दिगंबरबुवा, सोलापूर ... ... ... ... | ,, |
| ,, व्यास बुवा ... ... ... ... | ,, |
| ,, जगन्नाथबुवा सुरतकर ... ... ... ... | ,, |
| ,, आबासाहेब मुजूमदार, पुणें ... ... ... ... | तंतूवादन |
| ,, नायडू, सोलापूर ... ... ... ... | फिडलवादन |
| ,, लाला गोखले, पुणें ... ... ... ... | तबलावादन |
| ,, मास्तर शांताराम कामत (प्रभाकर नाटक मंडळी) ... ... ... ... | गायन |
| ,, मेनका शिरोडकर, पुणें ... ... ... ... | गायन |
| ,, वसंतराव शिरोडकर, पुणें ... ... ... ... | तबलावादन |
| ,, जळगांवकर, पुणें ... ... ... ... | हार्मोनियम वादन |
| ,, रामभाऊ गुते, मुंबई ... ... ... ... | गायन |
| श्री. माधव गणपत लोणारी ... ... ... ... | भजन |
| श्री. ताराबाई, गदग ... ... ... ... | गायन |
| कु. लीला दिघे, मुंबई ... ... ... ... | गायन |
| कु. पाटणकर (प्रभाकर नाटक मंडळी) ... ... | गायन |
| श्री. कौसल्याबाई मंजेश्वर, मुंबई ... ... ... ... | गायन |
| श्री. डी. के. मंजेश्वर ,, ... ... ... ... | तबला वादन |

श्री. दत्तात्रेय जनार्दन नगरकर, पुणें, बी. ए. बी. टी. यांचें आध्यात्मिक विषयावर सप्रयोग प्रवचन झालें.

प्रभाकर संगीत नाटक मंडळीचा ' राजा हरिश्चंद्र ' या नाटकाचा प्रयोग झाला.

समाधी मंदिरावरील कळसाचें बांधकाम चालू आहे.

बाथरूम जवळ हौदाचें व पायखान्याचें नवीन बांधकाम चालू झालें आहे.

हवापाणी उत्तम आहे.

---

## फेब्रुवारी १९५२

या महिन्यांत बरेच श्रीसाई भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

**देणगी**—श्रीसाई संस्थानकडे, कपड्याचे, सोन्याचांदीचे व पितळेचे एकूण ४५ भक्तांकडून जिन्नस देणगीदाखल आले.

श्री. एम्. आर. पट्टम नाशिक यांच्याकडून एक डबल रीडची हार्मोनियम पेटी आली.

**धर्मकृत्य**—अभिषेक, अर्चन, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे भक्तांचे विधी संस्थानकडून यथासांग केले गेले. पांच भक्तांनीं श्रीमंदिरांत श्रीसत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

**कीर्तन**—संस्थान गवई यांची माघ शु०॥ ११ व महाशिवरात्र अशीं दोन कीर्तनें झालीं. श्री. ह. भ. प. रामराव देसाई, श्री. भानुदासबुवा व श्री. गंगाधर शास्त्री रामदासी या बाहेरगांवच्या कीर्तनकारांचीं कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं.

**नवलविशेष**—खालील कलाकरांनीं श्रीपुढें हजेरी दिली.

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. वसंतराव देसाई, मुंबई | ... | ... | संगीत गायन |
| ,, सिद्धेश्वर तुकाराम, गुलबर्गा | ... | ... | सतारवादन |
| ,, गणपतराव सुंभे<br>,, रामा सावंत<br>,, दत्तात्रेय न्हावी | } पोवाडे गायन | | |
| ,, गोपाळ कोरगांवकर | ... | ... | शक्तीचे प्रयोग |
| ,, श्रीपादराव जमखंडे, हुबळी | ... | ... | संगीत गायन |
| ,, डॉ. स. वा. भट, पुणें | ... | ... | ,, |
| ,, कृष्णराव चोणकर | ... | ... | ,, |
| ,, बापूराव गुरव | ... | ... | तबलावादन |
| सौ. हिराबाई जव्हेरी<br>श्री. अनिलकुमार जव्हेरी } मुंबई | ... | ... | तबलावादन |
| ,, शंकर वासुदेव ढोले, मुंबई | ... | ... | गायन |
| सौ. निलाबाई भट | ... | ... | ,, |
| श्री. सरोज गुते | ... | ... | ,, |
| ,, नन्हेबाबू | ... | ... | ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, रंगनाथ मिराणे | ... | ... | तबला वादन |
| ,, दामूअण्णा दळवी | ... | ... | सनई वादन |
| वे. मु. द. ग. शिवपुरकर, पैठण | ... | ... | ब्राह्मण वेदमंत्र |

श्रीसाईनाथ क्लब कोपरगांव यांनीं 'शंभू राजे' या नाटकाचा प्रयोग केला.

नवीन बांधकाम (कळसाचें, पाय खाना, हौद, निंबवृक्ष पाराचें व नवलकर वाडा पश्चिम बाजूकडील ४ खोल्यांचें) चालू आहे.

हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी
श्री. साई संस्थान

# श्री साईनाथ महाराज

## वाक्तुषार

हिंमत धरा, सत्यनिष्ठा सोडूं नका. हिंमत आणि सत्यनिष्ठा यांच्या जोरावर निश्चयपूर्वक वाटेल त्या मोक्षमार्गाचें अवलंबन तुम्हीं केलें तरी पूर्णब्रह्मप्रत पोंहोचणारच.

× × ×

सत्य शोधनाचा मार्ग चालत असतां मात्र, त्यापासून लेशभरही न ढळण्याची खबरदारी अवश्य घेतली पाहिजे.

× × ×

आपण दुर्बल आहों असा विचार मनांत आणणें हेंच महापाप होय.

× × ×

कशाचिही भीति न बाळगणें, अगदीं निर्धास्त असणें, हीच या जगांत जिवंत रहाण्याची गुरुकिल्ली होय.

× × ×

आपलें पुढें काय होईल याबद्दलची बिलकूल फिकीर करूं नका. आणि दुसऱ्यावर कधीं अवलंबूनहि राहूं नका. ज्या क्षणीं तुम्हीं बाह्य मदत घेण्याचें साफ नाकारलें, त्या क्षणापासून तुम्हीं मुक्तच आहांत.

× × ×

यदृच्छेनें जे भोग मिळतील ते खुशाल भोगा; परंतु ते मिळविण्याच्या मार्गें लागूं नका किंवा मुद्दाम टाकूंहि नका. आपल्यावर कशाचाहि परिणाम न होऊं देणें हेंच खरें स्वातंत्र्य होय. दुर्भोग भोगण्याचा प्रसंग दुर्दैवानें आला तरी आपली उदासीन वृत्ति सोडूं नका.

× × ×

परमेश्वराच्या सेवेला स्वतःला अर्पण करणारे लोकच, स्वतःला लोकसेवक म्हणविणाऱ्या इतर कोणत्याही लोकांपेक्षां जगाच्या अधिक उपयोगी पडतात.

× ×

धर्मोपदेशकांच्या एका पथकाकडून जें लोककल्याणाचें कार्य होणार नाहीं, तें पूर्ण चित्त शुद्धि झालेल्या एका मनुष्याच्या हातून होऊं शकेल.

× × ×

मौन आणि शुचिता यांच्यापासूनच सामर्थ्ययुक्त वाणीचा जन्म होतो.

(विवेकानंद)

× × ×

बाबांचा वाघ्या.

## कै. मधुसूदन धोंडू कांबळी

श्रीसाई संस्थान कमिटीचे सन १९४६ पासूनचे एक सभासद व बृहन्मुंबईचे प्रख्यात चित्रकार श्री. म. धों. कांबळी, हे पैठणला आपल्या चित्रांचें प्रदर्शन उघडण्यांस गेले असतां तेथें ते ता. १२–३–१९५२ रोजीं कॉलऱ्याच्या विकारानें कालवश झाले त्याबद्दल संस्थान कमिटीस अत्यंत दुःख होत आहे. संस्थानकमिटी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखांत सहभागी आहे.

श्री. कांबळी हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण या गांवचे परंतु त्यांचें कार्यक्षेत्र मुंबईच होतें. ते स्वभावानें प्रेमळ असल्यामुळें लहानापासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकास प्रिय होते. त्यांची रहाणी साधी पण त्यांत कलात्मकतेची चमक असे.

श्रीसाईबाबांविषयीं त्यांचें ठिकाणीं फार निष्ठा होती. आज सुमारें सहा वर्षें ते संस्थान कमिटीचे सभासद म्हणून संस्थानचे काम पहात होते. १९४८ पासूनचे श्रीसाईलीला मासिकाच्या मुखपृष्ठावरील फोटो हे त्यांनीं स्वतः काढलेले आहेत. संस्थानचे ते एक कळकळीचे कार्यकर्ते होते.

अगदीं अल्पवयांत ते काळाच्या कराल दाढेंत सांपडावेत व काळानें त्यांना आमच्यांतून ओढून न्यावें ही खरोखर खेदजनक गोष्ट होय. तरी श्रीसाईबाबा त्यांना आपल्या चरणीं स्थान देतील यांत शंका नाहीं.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | | किंमत रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] | .... .... | ७ | ० | ० |
| २ | सच्चरित्र [ इंग्रजी ] | ... .... | ४ | ० | ० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | .... | ० | २ | ० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] | .... | ० | ८ | ० |
| ५ | सगुणोपासना | .... .... .... | ० | ३ | ० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] | .... .... | १ | ४ | ० |

वरील पुस्तकाकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळया साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, शिरडी संस्थान, मु. शिरडी, पो. राहातें, जि. अहमदनगर

खजिनदार, त्रि. शा. कीर्तिकर, २१३, धन बिल्डिंग, चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादकः-डॉ. के. भ. गव्हाणकर यांनीं काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रकः-के. एन्. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई ४